MAHMAR/12258/13/1/2009-TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तेरावे / अंक ४ / एप्रिल २०१२

## संपादकीय

## "आई तुझी आठवण . . ."

'श्यामची आई' हा विषय बराच जुना असला तरी 'मातृत्व' शिल्लक असेल, तेथवर हा विषय टिकून राहणारा आहे. आज या विषयाची आठवण येण्याचे कारण म्हणजे श्री. प्रकाशभाई मोहाडीकरांच्या अलीकडील एका मुलाखतीत आपण या पुस्तकाच्या लाखो प्रती विकल्या हे त्यांचे विधान. साने गुरुजींची जी धडपडणाऱ्या मुलांची पिढी होती त्यातील प्रकाशभाई हे आदराने घ्यावे असे नाव.

दुसरे निमित्त बातमीचे होते. 'श्यामची आई' ची मराठीत पुन्हा निर्मिती होते आहे व त्यासाठी चित्रपट सृष्टीतील 'वलयांकित' नायिकांची नावे. बदल अपरिहार्य असल्याने काळ बदलला, माणसे बदलली व सर्वच संकल्पना पार आपादमस्तक बदलल्या. त्यामुळे श्यामची आई, श्याम व तिच्या नात्यातील संस्कारांचा पाया आणि आजची आई, आजचा श्याम यांतील नाते यावर विचार करावासा वाटला.

श्यामच्या आणि आजच्या आईच्या प्रतिमेत, अस्तित्वात खूपच फरक पडला. आपल्या मुलावर संस्कार कसे करायचे, त्याचे संगोपन कसे करायचे, त्यासाठी कसा आणि कशाकशाचा त्याग करायचा याचे भान असणारा तो काळ होता. त्यासाठी स्वतंत्र पुस्तके लिहावीत अभ्यासक्रम करावेत यांची गरज नसणारा तो काळ मानवी नातेसंबंधांची वीण निर्माण होणारा, या नात्यांच्या संस्कारांचा, मूल्यांचा काळ होता. दूरदर्शनच्या अस्तित्वाने घराचा कोपरा व्यापला नव्हता. एकत्र कुटुंब पद्धत असल्यामुळे माणसा माणसात लागतेपण होते. मानवी नात्यांच्या अशा जिव्हाळ्यातून जे निर्माण होई त्यास समाज म्हणत.

सख्खी, चुलत, मावस, आत्ये मामे भावांची, भावजय दिरांची, सासू सुनांची एकत्र वर्दळ असे आणि तीच एकत्र कुटुंब पद्धत होती.

काळाच्या ओघात हे सर्वच उत्खनन करून पाहावे इतके खोल नाहीसे झाले. हे चांगले आहे की नाही हा व्यक्तीचा,

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

सापेक्ष व काळाचा संदर्भ असणारा प्रश्न आहे. अर्थसत्ता बदलली तशी समाजरचना बदलली आणि एकत्र कुटुंबातील माणसांची जडणघडण वन रूम कीचन, टू रूम कीचन या मापांत मोजली जायला लागली. आई बदलली, मूल असणं, नसणं, त्याचे प्रेम असणे नसणे हे सर्व बदलले. नात्यांतील आपुलकीची भावना विसविशित झाली. नातेसंबंधातील ओढ, जिव्हाळा यांची जागा मालकी हक्काने घेतली, माणसं वापरून फेकून द्यायची या व्यवहाराने घेतली. हा बदल घडतोय आहे त्यामुळे यात नवीन ते काय असा प्रश्न आपल्याला पडेल. ही तक्रार नाही, ती करूनही उपयोग नाही. वाईट इतकेच आहे की 'आई'ची झालेली 'ममा' हा काळजीचा विषय आहे. मातृत्व टिकेल पण त्यातील आशय? माझा/माझी मुलगी यातील माझेपणातले प्रेम संपले आणि स्वामित्व हक्का पोटी त्या भावनेचे वाटेल ते केले जायला लागले, तेव्हा ते मूल प्रॉडक्ट ठरायला लागलं. करिअर आणि पैसा या दोन बाबींनी आयुष्यात स्वातंत्र्य आणि व्यक्तिस्वातंत्र्य या संकल्पनांमध्ये घोळ घालून ठेवला.

मुलगा / मुलगी गप्प राहावी यासाठी एखादे कार्टून लावून दिले जाते. कुत्रा साखळीला बांधून त्याला गप्प करण्याचे हीच यामागेही भावना असते. बाहेरचे वाईट विचार, वाईट शक्ती घेऊन बाहेरच्या पिशवीतल्या झटपट पदार्थासह शिरायचे. मुलांनी ही नकळत ते आत्मसात करायचे! हे असे कुसंस्कार खाद्य संस्कृतीवर खोलवर उमटायला लागलेत. जंक फूड, झटपट खाद्य पदार्थ खाऊन मुले सुजतात. वर येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाला "काय करणार" स्वयंपाकाला वेळच नाही हो!"म्हणत आपल्या 'बीझी' वेळापत्रकाच्या प्रती वाटायच्या घरातील करत्या स्त्री ने, म्हणजेच आईने चांगले चुंगले पौष्टिक पदार्थ मुलांसाठी करावेत, स्वतःचं मन त्यात ओतावं, 'आईच्या हाताची चव' त्या पदार्थात उतरावी असं कोणाला हल्ली वाटतही नाही. बर्गर, पिझ्झा, वडापाव यासारख्या पदार्थांचा शोध आपल्यासाठीच लागला आहे असे सांगणारी आई भ्रमणध्वनीवरून नाक्यावरच्या 'चायनीज वाला', वडे वाला ऑर्डर देते. मुले हे सगळे पाहत असतात. भूक लागली की असंच करतात हा संस्कार त्यांच्या अंतर्मनात टिपला जातो.

शंकरपाळी, मूगलाडू कुरडया अशा पदार्थांची नावे काढली तरी आई पटकन म्हणते, 'शी' असलं काही आवडत नाही हं आम्हांला... या आईला खाद्यातून मनावरही संस्कार होतात हे कोण सांगणार? जाहिरातीत दिसणारी 'व्हिटॅमिन नावाखाली विकल्या जाणाऱ्या भुसायुक्त पेये म्हणजे एनर्जी' असं सर्व असलेल्या पिढीला "श्याम पायाला माती लागू नये म्हणून जपतोस ना... तशी मनाला घाण लागू नये म्हणूनही जप हो" अशा प्रभावी संवादातलं आई चं मन कळेल?

आजोबा म्हणजे 'दॅट ओल्ड फेलो', काका किंवा काकू म्हणजे 'दॅट डॅम बोअर' असं घरातंच शिकणारी मुले पाहिली की 'वृद्धाश्रम एक काळाची गरज' या विषयावर लोक का लिहितात ते सहज समजते. चोवीस तास रवंथ करत कार्टून बघणारी पिढी हा म्हणूनच काळजीचा विषय ठरतो. आईच्या हातच्या पदार्थाला प्रमाण होते, चव होती. त्यावर प्रीझर्वेटिव्ह ची लेबल नसायची 'इनग्रेडियंट' आईच्या

(पृष्ठ क्र. ११ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष तेरावे / अंक ४ / एप्रिल २०१२

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १६ वे/अंक १० वा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२६२७०
www.vpmthane.org

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिन्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | - श्री. मोहन पाठक | |
| २) | स्वातंत्र्यवीर सावरकरांचे सहा सोनेरी पाने | - श्री. अंकुर राणे | ३ |
| ३) | स्वामी रामतीर्थ (लेखांक ३) | - श्री. शं. बा. मठ | ७ |
| ४) | महत्त्व वाचन संस्कृतीचे | - सौ. विद्या वसंत फडके | १२ |
| ५) | शिवमानसपूजा | - नीलकण्ठसुत | १५ |
| ६) | डॉ. आगरकर यांना संजीवराय सर्मा पुरस्कार | - प्रतिनिधी | १६ |
| ७) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | - श्री. यशवंत साने | १९ |
| ८) | डॉ. मोरेश्वर दिनकर पराडकर | - श्री. मोहन पाठक | २५ |
| ९) | ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी दत्താजी ताम्हणे | - श्री. श्रीकान्त नेर्लेकर | २८ |
| १०) | आवाज कुणाचा? | - डॉ. महेश बेडेकर | ३१ |
| ११) | परिसर वार्ता | - संकलित | ३३ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वंत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
  कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
  या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# स्वातंत्र्यवीर सावरकरांचे सहा सोनेरी पाने

*विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने गतवर्षे घेण्यात आलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या साहित्यासंदर्भातील पारितोषिक प्राप्त असा हा पुढिल लेख. 'सहा सोनेरी पाने' या ग्रंथाच्या संदर्भातील लेख – संपादक*

*झाले बहु, होतील बहु*
*परि या सम हा ।।*

अशा शब्दांत ज्यांचे वर्णन करावे, एवढी श्रेष्ठता आपल्या कर्तृत्वाने प्राप्त केलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी झाला. सुप्रसिद्ध लेखक डॉ. प.वि. वर्तक यांच्या मते पांडवांचा पुर्नजन्म सावरकरांच्या कुटुंबात झाला. त्यांच्या हा पुर्नजन्म होता की नाही, हा जरी वाद विषय असला तरी त्यांचे कार्य मात्र खचितच पांडवांइतकेच श्रेष्ठ दर्जाचे होते.

त्यांच्या साहित्याचा विचार करावयाचा झाल्यास ते एक उत्तम दर्जाचे कवी, लेखक, नाटककार आणि इतिहासकार होते. साहित्यामधील एकही क्षेत्र असे नाही की ज्यामध्ये सावरकरांचे काही कार्य नाही. सावरकर हे जाज्वाल्य देशाभिमानी होते. भारतीय स्वातंत्र्याची ओढ त्यांना सतत अस्वस्थ करत होती. त्यांचे क्रांतिकार्य तर सर्वश्रुत आहेच. याबरोबरच सावरकर हे आत्यंतिक हिंदू धर्माभिमानी होते. परंतु त्याचवेळी हिंदूधर्मातील जातिव्यवस्था, सिंधुबंदी यांसारख्या समाजघातक प्रथांवर कोरडे ओढण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. जातिव्यवस्थे विरुद्ध त्यांनी अनेक आंदोलने केली. रत्नागिरीमधील पतितपावन मंदिर दलितांना खुले व्हावे यासाठी त्यांनी केलेला संघर्ष प्रसिद्धच आहे. आणि तरीही आजचे भारत सरकार त्यांना 'प्रतिगामी' मानते, यापरते दुसरे दुर्दैव नाही. सावरकरांविषयी असं म्टलं जातं की ते महाकवी असून महाकवी होऊ नाही शकले.

स्वा. सावरकरांच्या इतिहासविषयक ग्रंथांचा विचार करावयाचा झाल्यास प्रामुख्याने तीन ग्रंथांची नावे नजरेसमोर येतात. सहा सोनेरी पाने, हिंदूपदपादशाही आणि तिसरे म्हणजे १८५७ चे स्वातंत्र्यसमर. यापैकी 'सहा सोनेरी पाने' या ग्रंथाचा विचार प्रस्तुत लेखात करावयाचा आहे.

कुठल्याही साहित्यिक कलाकृतीमध्ये लेखकाची मते प्रतिबिंबित झालेली असतात. आधी म्हटल्याप्रमाणे सावरकर हे कट्टर हिंदुत्ववादी होते. त्यांची हीच मते 'सहा सोनेरी पाने' या ग्रंथात व्यक्त झालेली आहेत. साहित्याच्या अनुषंगाने सावरकरांचा विचार करावयाचा झाल्यास '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथात सावरकरांनी राष्ट्रीय लढ्यात आणि सामाजिक जीवनात हिंदू-मुसलमान ऐक्याचा पुरस्कार केला आहे. त्यावेळच्या राजकीय परिस्थितीची ती निकड होती. परंतु १८५७ चे स्वातंत्र्य समर आणि सहा सोनेरी पाने या दोन ग्रंथांच्या लेखन कालावधीमध्ये भारतीय राजकरणात आणि हिंदू-मुसलमान संबंधांमध्ये असे काही अनाकलनीय आणि दुर्दैवी बदल झाले, की ज्यामुळे सावरकरांना आपले विचार बदलावे लागले.

'सहा सोनेरी पाने' ग्रंथाची निर्मिती का झाली याचा विचार करणे आवश्यक आहे. ग्रंथनिर्मितीचे एक संभवनीय कारण असे की इंग्रजांनी असे प्रतिपादन करण्यास सुरुवात केली, की हिंदूंचा इतिहास हा केवळ पराभवांच्या आणि पारतंत्र्याच्या मालिकांनी भरलेला असून त्या विषयी प्रत्येक हिंदू व्यक्तीस लाज वाटली पाहिजे. या धादांत असत्य मताचा खोडसाळ प्रचार आधुनिक शिक्षणाच्या नावाखाली

सुरू करण्यात आला. 'जो समाज आपला इतिहास विसरतो त्या देशास उज्वल भविष्यकाळ नसतो.' हिंदू समाजाने आपला अभिमानास्पद खरा इतिहास विसरावा यासाठी चाललेले जाणीवपूर्वक प्रयत्न हाणून पाडण्यासाठी इतिहासाविषयी, आपल्या धर्माविषयी सुस्त आणि उदासीन बनलेल्या हिंदू समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी तसेच इतिहासात केलेल्या चुका पुन्हा होऊ नयेत, यासाठी काय करणे आवश्य आहे हे हिंदू समाजाला दाखवून देण्यासाठी सावरकरांनी या ग्रंथाची रचना केली; असा अंदाज या ग्रंथात मांडलेली मते आणि वापरलेली भाषा यांवरून करता येतो.



स्वातंत्र्यवीर सावरकर

भारताच्या इतिहासातील सोनेरी पाने कोणती आणि त्यांची कारणे यांची मीमांसा प्रत्यक्ष सावरकारांनीच आपल्या ग्रंथाच्या सुरुवातीस केली आहे. सावरकरांच्याच शब्दांत सांगावयाचे झाले तर, "प्रत्येक मोठ्या राष्ट्रावर केव्हा ना केव्हा पारतंत्र्याचे संकट कोसळलेलेच असते." या विधानास प्रमाण म्हणून त्यांनी चीन व अमेरिका या बलाढ्य आणि विशाल राष्ट्रांची उदाहरणे दिली आहेत. या राष्ट्रांप्रमाणेच भारतावरही पारतंत्र्याचे संकट अनेक वेळा कोसळले, पण प्रत्येक वेळी हिंदूंनी त्यांना कडवा प्रतिकार केला. त्यांची येथील सत्ता सुद्धा औटघटकेची ठरली. प्रत्येक वेळी हिंदूंनी आपले स्वातंत्र्य लढून परत मिळविले. 'सहा सोनेरी पाने' हे गेल्या २००० वर्षांतील भारताच्या इतिहासाचा धावता वैचारिक आढावा आहे. जेव्हा जेव्हा या भूमीला परकीयांनी पारतंत्र्याच्या शृंखलांमधे अडकवले, त्या त्या वेळी येथील हिंदूंनी झुंजारपणे लढून या भूमीला मुक्त केले. त्या झुंजार हिंदूंचा आणि त्यांच्या विजिगीषु वृत्तीच्या महान नेत्यांचा इतिहास म्हणजे सोनेरी पाने होत. हा इतिहास सांगताना त्यांनी स्वकीयांचे नि परकीयांचे गुण तसेच दोष परखडपणे सांगितले आहेत. आपल्या विजयाची गाथा त्यांनी शाहिरी थाटात गौरवली आहे त्याचप्रमाणे आपल्या पराभवाची कारणे सुद्धा स्पष्टपणे सांगितली आहेत. भविष्यद्रष्ट्या सावरकरांनी पुन्हा परकीय आक्रमण या भूमीत घुसलेच, तर त्या वेळी काय करावे आणि काय टाळावे याचे विवेचन केले आहे, असे कधी कधी वाटून जाते. दुर्दैवाने आपण आज सावरकरांची मते प्रतिगामी म्हणून दुर्लक्षित करत आहोत. त्याचे दुष्परिणाम आपल्याला लवकरच भोगावे लागतील. कारण सावरकरांनी सांगितल्या प्रमाणे भौगोलिक दृष्ट्या भारत शत्रूराष्ट्रांच्या बेचक्यात सापडला आहे. अशा वेळी सावध रहाणे हीच काळाची गरज आहे.

भारताच्या इतिहासातील सोनेरी पान पहिले यामधे सावरकरांनी चंद्रगुप्त मौर्य आणि आर्य चाणक्य यांच्या कार्याचा गौरव केला आहे. तसेच त्या आधी झालेल्या अलेक्झांडर दि ग्रेट याच्या स्वारीच्या वेळी वायव्य सरहद्दीवरील गणराज्यांच्या अभिमानास्पद स्वातंत्र्याकांक्षेचे आणि शौर्याचे वर्णन करतात. परंतु त्याचवेळी अंभी राजाच्या विश्वासघातकी, राष्ट्रघातकी वर्तनाची सुद्धा मीमांसा स्पष्टपणे केली आहे. चंद्रगुप्त मौर्याने, आर्य चाणक्याच्या सहाय्याने हिंदूंना अभिमानास्पद अशा मौर्य साम्राज्याची स्थापना केली व भारताला ग्रीक पारतंत्र्यातून मुक्त केले. पुढे पुन्हा भारतावर चालून आलेल्या ग्रीक सेनापती सेल्युकस निकेटरचा निर्णायक पराभव केला. हेच भारतीय इतिहासातील सोनेरी पान पहिले.

सम्राट अशोकाने बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर अहिंसेच्या भोंगळ तत्वज्ञानामुळे भारतीय क्षात्रवृत्तीचा ऱ्हास झाला होता व भारत पुन्हा पारतंत्र्याच्या उंबरठ्यावर उभा होता. हिंदू राष्ट्राचा हा अपमान सहन न होऊन पुष्यमित्र शुंग, जो मौर्यांचा सरसेनापती होता, याने बंड करून राजसत्ता ताब्यात घेतली व आपल्या सेनेच्या महाय्याने परकीयांचा अनेक ठिकाणी पराभव करून ही भूमी मुक्त केली. यावेळी वैदिक धर्मी किंवा हिंदूधर्मी राजसत्ता उलथवण्यासाठी परकीयांना सहाय्य करून राष्ट्रदेहाचे पातक केले. परंतु पुष्यमित्राने अशा देशद्रोह्यांना कडक शासने केली आहेत. सावरकरांनी पुष्यमित्राचा 'रचनात्मक सम्राट' असा गौरव केला आहे. हेच भारतीय इतिहासातील सोनेरी पान दुसरे.

मौर्य साम्राज्याच्या विघटनानंतर अनेक शतकांनी गुप्तांनी भारतात प्रबळ साम्राज्याची स्थापन केली. गुप्त घराण्यातील चंद्रगुप्त या राजाने आपल्या सुसज्ज सेनेच्या साहाय्याने भारतावर राज्य करणाऱ्या शकक्षत्रपांसारख्या परकीयांचा पराभव करून भारतीय प्रदेश स्वतंत्र केला. शकांचा सम्राट रूद्रसिंह हा बौद्धधर्मीय असल्यामुळे ह्यावेळी सुद्धा बुद्धांनी राष्ट्रद्रोहाचे पातक केलेले आढळते. शकक्षत्रपांवर मिळवलेल्या विजयाच्या स्मरणार्थ चंद्रगुप्ताने 'विक्रमादित्य' ही पदवी धारण केली व विक्रम संवत चालू केला. हे भारतीय इतिहासातील सोनेरी पान तिसरे होय.

प्राचीन काळी हुणांच्या टोळधाडीने संपूर्ण ज्ञात जगास हादरवून टाकले होते. कुठलेही प्रबळ साम्राज्य हुणांपुढे टिकाव धरू शकले नाही. परंतु हिंदूंनी मात्र या रानटी हुणांना सम्राट स्कन्दगुप्ताच्या नेतृत्त्वाखाली पराभूत केले. यानंतरची ४० वर्षे हुणांना भारताकडे बघण्याची सुद्धा हिंमत झाली नाही. हा महापराक्रमी हिंदू सम्राट स्कन्दगुप्त A Roman emperor must die standing. या उक्तीप्रमाणे समरशिबिरातच मृत्यु पावला. स्कन्दगुप्तानंतरचे सम्राट दुर्बल असल्यामुळे हुणांचे संकट भारतास पुन्हा भेडसावू लागले. मिहिरगुप्त नावाच्या हूण राजाने भारताचा बराचसा भाग आणि राजधानी पाटलीपुत्र जिंकली. त्यानंतर त्याने हिंदू धर्माचा स्वीकार केला. असे जरी असले तरी हिंदूंनी त्याला परकीयच मानले. हा मुख्य फरक होता हिंदूंच्या आणि बौद्धांच्या राष्ट्रभक्तीतला मालव प्रांतातील यशोधर्मा नावाच्या लहानशा राजाने सर्व हिंदूंनी परकीय राजवटी विरुद्ध एकत्र आणले आणि इतर हिंदू राजांच्या संयुक्त फौजांच्या मदतीने मिहिरगुप्ताचा पराभव केला. हेच भारतीय इतिहासातील सोनेरी पान चौथे.

सावरकरांनी भारतीय इतिहासाचे प्रचीन आणि अर्वाचीन असे दोन खंड कल्पिले आहेत. इतिहासाच्या चौथ्या सोनेरी पानाबरोबरच प्राचीन कालखंड समाप्त होतो. आधुनिक काळाच्या सुरुवातीसच मुसलमानी आक्रमकांनी भारतावर स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. पाश्चात्य इतिहासकारांनी असा समज करून दिला आहे की, हिंदूंनी मुसलमानांना भारताच्या वायव्य सरहद्दीवरच अडवून धरले होते. चितोड पुन्हा जिंकून घेतले होते हे पाश्चत्य इतिहासकार जाणीवपूर्वक नोंदवत नाहीत. इतिहासात जाणूनबुजून अप्रसिद्ध ठेवल्या गेलेल्या खुशृखान आणि देवलदेवी यांच्या हिंदूहितकारक कार्याचे वर्णन सावरकरांनी आधुनिक कालखंडात केले आहे. हिंदूंच्या पराभवाच्या कारणांची चर्चा करताना त्यांनी युद्धपद्धती, धर्मसहिष्णुता, न्यायीवृत्ती आणि सद्गुणविकृती यांना प्रामुख्याने जबाबदार धरले आहे.

सतराव्या शतकात संपूर्ण भारत मुसलमानी बादशहांच्या जुलुमाखाली पिचत होता. अशा या क्षणी पारतंत्र्याच्या श्रृंखला तोडून हिंदूराष्ट्रास मुक्त करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वातंत्र्ययुद्धास सुरुवात केली. त्यांच्या या आवाहनसार प्रतिसाद देऊन महाराष्ट्राने औरंगजेबासारख्या बलाढ्य, क्रूर आणि धर्मांध बादशहाचा पराभव केला. मराठ्यांनी अखिल हिंदुस्थान

स्वतंत्र करण्यासाठी महाराष्ट्राबाहेर पाऊल टाकले आणि अफगाणिस्तानच्या सीमेवरील अटक किल्ल्यापर्यंत फौजा नेल्या. हेच भारताच्या इतिहासातले पाचवे सोनेरी पान. कुठल्याही क्रांतीस नैतिक पार्श्वभूमी असेल तरच ती यशस्वी होते आणि म्हणूनच मराठे म्हणजेच हिंदू सतत यशस्वी झाले.

मराठ्यांचा पराभव करून इंग्रजांनी १९ व्या शतकात आपल्या राज्याची स्थापना केली. अनेक अंगांनी हे साम्राज्य वेगळे आणि दुर्जेय होते. असे असुनसुद्धा हिंदूंनी लढून १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य परत मिळाविले. भारतास स्वातंत्र्य अहिंसेच्या आणि सत्याग्रहाच्या बाष्कळ तत्त्वज्ञानामुळे मिळाले नसून ते लढून मिळवावे लागले आहे. आणि हेच भारतीय इतिहासातील शेवटचे सहावे सोनेरी पान प्रस्तुत लेखात म्हटल्याप्रमाणे अशा पद्धतीचे सातवे सोनेरी पान लिहिण्याची वेळ आपणावर न येवो हीच सदिच्छा.

सहा सोनेरी पाने वाचल्यावर भारताच्या इतिहासाकडे पाहण्याची वेगळी दृष्टी येते.

श्री. अंकुर राणे
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे

•••

सावरकरांसारख्या, शिवाजी महाराजां सारख्या साक्षेपी नेत्यांची नावे घेण्याची ज्यांची लायकी नाही असे नादान असे नेते देशाला मिळावेत हे या मातीचे दुर्दैव! द्रष्टेपणा, निष्ठा, मातृभूमीचे प्रेम सांगता येत नाही. दुर्दैव असे की देश विकला गेला तरी त्याला स्वतंत्र करू शकेल असा एकही नेता नाही.

'सावरकर नावाचा सूर्य'
(श्री. ना. गोखले)

शिक्षण व संशोधनातील कौशल्यांवर ज्ञानयुक्त समाजाची रचना झालेली असते. इंटरनेट (आंतरजाल), संप्रेषण तंत्र ज्ञानातील प्रगती व झपाट्याने वाढत असलेली जागतिक स्तरावरील फायबर ऑप्टिकल नेटवर्क्स (काचतंतू) ची गरज तर आहेच पण ज्ञानयुक्त, ज्ञानाधारित समाजासाठी तेवढेच पुरेसे ठरत नाही. जे वापरकर्ते नाहीत अशांना प्रशिक्षण देणे, शिक्षित करणे, एकत्रित करणे व त्यांची कल्पनाशक्ती विकसित करणे यात वेळेचा अपव्यय आहे. जागतिक स्तरावरील ज्ञानाधारित समाज निर्माण करावा हे सन २०१२ च्या अमेरिकन असोसिएशन फॉर द ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्सच्या व्हॅंक्युअर येथे १६ ते २२ फेब्रुवारी दरम्यान झालेल्या बैठकीत चर्चिण्यात आले होते. वैज्ञानिक व शिक्षण क्षेत्राशी संबंधित अशा ५० देशांतील प्रतिनिधींच्या या बैठकीत विकसित व विकनशील देशांच्या प्रगतीच्या संदर्भात हा मुद्दा चर्चिण्यात येणार होता.

संदर्भ

नीना फेडेरॉफ (संपादकीयातून)
'सायन्स' अंक ३३५
३ फेब्रुवारी २०१२, पृ. ५०३

# स्वामी रामतीर्थ

(लेखांक चौथा)

*श्री स्वामी रामतीर्थांवरील लेख मालेतील हा चौथा लेख. रामतीर्थांच्या जपानमधील वास्तव्याचे तपशील सदर लेखात श्री. शंकरराव मठांनी दिले आहेत.*

**जिज्ञासूंच्या भेटी :**

एक गृहस्थ स्वामीजींच्या भेटीसाठी आले. वंदन करून म्हणाले, मला संसारात रस वाटत नाही परमार्थात आनंद आहे. संन्यास घ्यावा असे वाटते. स्वामी - 'महाशय संन्यास सोपे काम नाही.' ती सुळावरची पोळी आहे. संसारातला आनंदच परमार्थात आनंद निर्माण करतो. संसार थांबला की आनंदही थांबला. 'स्वामींनी या गृहस्थाला एक कथा सांगितली. घोडेस्वाराने घोड्याला पाणी पाजण्यासाठी पाण्याच्या रहाटा जवळ नेले, घोडा पाणी पिईना. तो रहाटाच्या आवाजाने बुजला. घोडेस्वार शेतकऱ्याला म्हणाला दादा थोडा वेळ रहाट थांबवा. घोड्याला पाणी प्यावयाचे आहे. शेतकरी म्हणाला गृहस्था रहाट थांबवताच पाण्याचा उपसा होणार नाही पाणी मिळणार नाही तुझा घोडा तसाच तहानलेला राहील. त्याला खरी तहान लागेल त्यावेळी रहाटाच्या मोठ्या आवाजातही पाणी पिईल. संसाराच्या कटकटी परमार्थात उपयोगी पडतील त्यातच आनंद मिळवण्याचा प्रयत्न कर. त्यांचा उपदेश गृहस्थांना पटला समाधानाने ते परतले.



तेथून स्वामीजी सुमेरू पर्वतावर आले. ते स्थान अतिशय रम्य होते, तिथे अपेक्षित एकांत मिळाला. एका पत्रात ते लिहितात, ''काश्मीर पेक्षा येथील वातावरण अत्यंत आनंददायक आहे. परमेश्वराचे खरे वैभव पाहण्यासाठी साधकाने काही काळ तरी येथे वास्तव्य करावे. येथील मेघाचे सावळे वर्ण श्रीकृष्णाची आठवण करून देतात. पाऊस पडायला लागला, स्वामींना वाटले श्रीकृष्णाच्या मुक्त होणाऱ्या प्रेमधारा आहेत असा अनुभव आला. राम त्या पावसात ओला चिंब झाला. पण तेथून हलावेसे वाटेना. जेव्हा त्यांचे समाधान झाले तेव्हा प्रेम वर्षाव थांबला. ही ईश्वराची प्रचीती, दिव्यत्वाचा महान साक्षात्कार ते काव्य पंक्तीत सांगतात.

*जिधर देखता हूं जहां देखता हूं। मै अपनाही जलवा अया देखता हूं।*

*न तन देखता हूं न जां देखता हूं। खुद ही को निहाऔर अधा देखता हूं।*

*यह जो कुछ की बिदा है सबही तो मै हूं। मै कुछ बहरे हस्ती इकशां देखता हूं।*

*यह जो कुछ की बिदा है सबही तो मै हूं। मै कुछ बहरे हस्ती इकशां देखता हूं।*

*अगर कोई अपने बिना जगत जाने । तो उसको मै धोरखा देखता हूं।*

गंगोत्री जन्मोत्री यात्रा आटोपून ने बदरीकेदारला आले. भगवंताच्या समोर उभे राहून मोठ्याने ॐकाराचा नाद केला. स्वामी तिथे फारच थोड दिवस होते. हिवाळा येत चालला शिवाय डिसेंबर महिन्यातच शिवगणाचार्य

असंतुष्टता हे कलाकाराचे सर्वात मोठे सामर्थ्य असते. - ऑड्री हेपबर्न

यांनी मथुरा येथे एक धर्म परिषद बोलावली. त्याचे अध्यक्षपद स्वामीजींनी स्वीकारावे असं पत्र आले. म्हणून ते बदरी केदारहून निघाले व मथुरेला आले.

**धर्म परिषद :**

२५ डिसेंबर १९०१ रोजी धर्म परिषद होती. स्वामीजी अध्यक्ष आहेत हे कळताच सर्व मंडप भरून गेला. ॐकाराने परिषदेला सुरुवात झाली. सर्वात शेवटी स्वामीजींचे भाषण झाले - धर्मोरक्षति रक्षत: । याचे स्पष्टीकरण स्वामीजींनी आपला भाषणात केले. परिषदेला आलेल्या कृष्णचरण या गृहस्थाने लिहिले आहे की - स्वामीजींचे दर्शन झाले व सर्व शंकांचे निरसन झाले. त्यांच्या वाणीने कान तृप्त झाले. त्यांच्याशी बोलण्यात अगाध आनंद वाटे.

स्वामीजीकडे येणाऱ्या लोकांची गर्दी वाढली. एकदा एक सुशिक्षित महिला स्वामीजींच्या दर्शनास आली. तिने स्वामीजीपाशी सांसारिक दु:खाची कहाणी तिथे सांगितली. तिचे निवेदन संपतो. स्वामीजी डोळे बंद करून ऐकत होते. तिचे बोलणे संपल्यावरही स्वामीजीने डोळे उघडले नाहीत. बाईच्या मनात अनेक विचार आले. तोच स्वामीने डोळे उघडले. तिला वंदन करीत माते इतके बोलून ॐकार उच्चारीत जप करू लागले. ह्या महिलेकडे दृष्टीक्षेप टाकताचं तिचे अंतकरण एकदम शांत झाले. स्वामीजी म्हणजे महान विभूती आहे असे म्हणत ती खोलीतून बाहेर पडली, परत स्वामीजींना पाहून वंदन करुन म्हणाली मी अजाण आहे मला क्षमा करा.

या परिषदेनंतर ते म्हणाले राम बंदिस्त मंडपात बोलणार नाही. यमुनेच्या विशाल वाळवंटात आकाशाच्या छताखाली बोलेल. श्रोतेगण तिथेही जात. तेथे एक श्रावणनाथ नांवाचे श्रोते जात. ते म्हणत, श्रीकृष्णाची मुरली वाजताच गोपी गोळा व्हावयाच्या इतकी मोहिनी पडे. त्याच प्रमाणे स्वामीजींच्या भाषणांची मोहिनी आम्हां लोकांना पडली आहे.

सन १९०२ सालापर्यंत स्वामीजी मथुरेला होते. फैजाबाद येथे धर्म सभेच्या वार्षिक महोत्सवाचे अध्यक्ष पद स्वामीजींना देण्यात आले; ते नारायण स्वामी सह फैजापूरला आले. २ फेब्रुवारीला खुले अधिवेशन होते. अनेक धर्माचे विचारवंत तेथे जमा झाले होते. आत्मन या विषयावर नारायण स्वामी बोलले. एक मौलवी मुर्तजाअली खान यांनी व्याख्यानानंतर खुद्द स्वामीजींची भेट घेण्याचे ठरविले. नारायण स्वामीचे बोलणे संपल्यावर स्वामीजी समारोपासाठी उभे राहिले. मौलवी साहेब समोरच बसले होते. त्यांच्याकडे पाहात भाषणाला सुरुवात केली. एक तास कसा निघून गेला कळले नाही. भाषण संपले. मौलवी खाली मान घालून बसले होते. कारण त्यांच्या सर्व शंकाचे निरसन झाले होते. आता वादाला जागा नव्हती.

या धर्म सभेनंतर स्वामींच्या अनुज्ञेने नारायण स्वामी यानी संन्यास घेतला. धर्म प्रचारासाठी स्वामीजींच्या आज्ञेने ते कराचीस गेले. नारायण स्वामींना स्वामींजीपासून दूर जावे लागते याचे वाईट वाटले. स्वामींजी म्हणाले ही आसक्ती बरी नाही. ती टाक व कार्यासाठी जा. दोघेही लखनौला आले. गंगा प्रसाद वर्मा नावाच्या एकासधन गृहस्थाकडे स्वामीजी राहिले. घराला मोठी गच्ची होती तेथे स्वामीजींची वेदान्तावर प्रवचने होत.

व्याख्यानाचा विषय धर्म आणि विद्यार्थी - यावर तीन अमोल व्याख्याने झाली. सर्व सामान्याना धर्माचे मार्गदर्शन झाले. स्वत:काही न करता परकीय धर्माचे गोडवे गाणाऱ्यांचा स्वामीजींनी खरपूस समाचार घेतला. त्या दोघानी नंतर लखनौ सोडले. सिंधला जाणाऱ्या गाडीतून नारायण स्वामी कराचीला गेले. स्वामीजी तेथून

कोरिचा चेट्टी येथील एका शांत ठिकाणी गेले. याचेवेळी टेहरचे महाराज डेहराडूनला जावयाला निघाले होते. स्वामी इथे आहेत असे कळताच त्यानी जाण्याचा बेत रहित केला. व ते स्वामीजींच्या भेटीस आले. भेटीने महाराज भारावू गेले. तत्त्वज्ञान विषयावर खूप चर्चा झाली. महाराजांचे शंका समाधान झाले. महाराजांच्या विनंतीवरून त्यांच्या बरोबर स्वामीजी प्रताप नगर येथे गेले. तेथे बरेच दिवस महाराजांचे पाहुणे म्हणून राहिले.

**जपानला जाण्याचा योग :**

स्वामीजींचा मुक्काम प्रतापनगर येथे असतानाच जपान येथे सप्टेंबर महिन्यात धर्मपरिषद भरणार असल्याचे वृत्त वृत्तपत्रात आले. हे वृत्त वाचून टेहरीच्या महाराजांनी स्वामीजीनी जपानला जावे आणि धर्मपरिषदेला उपस्थित राहावे. भारताचे प्रतिनिधित्व करावे. यासाठी आग्रह केला. स्वामीजी म्हणाले – आता अगदी थोडाच वेळ राहिला आहे. अल्पकाळात तेथे जाण्याची व्यवस्था होणे ही कठीण. तेव्हा महाराजांनीच जावे. लगेच महाराजानी थॉमस कुक अँन्ड सनस् यांना पैसे पाठवून दोन तिकीटे निश्चित करण्याची विनंती केली. निश्चित झाल्यानंतर नारायण स्वामींना तार करून कलकत्यास येण्यास सांगितले. स्वामीजी महाराजांबरोबर कलकत्याला गेले. २० ऑगस्टला कलकत्याहून बोट निघणार होती. पण निघणे २८ तारखेपर्यंत पुढे ढकलले गेले. आठ दिवस कलकत्यात राहणे भाग पडले. त्यानंतर स्वामी रामतीर्थ आणि नारायण स्वामी बोटीवर चढले.

बोट हाँगकाँग बंदराला लागली. तेथे स्थायिक झालेले एक भारतीय शेठ वासियामळ यानी त्यांचे स्वागत केले. सिंधी व शीख यांची वस्ती तिथे बऱ्यापैकी होती. शिखांचे एक प्रार्थना मंदिरही तेथे होते. रामतीर्थांनी या गुरुद्वारला भेट दिली व तेथील लोकांबरोबर थोडी चर्चाही केली. रामतीर्थांची कीर्ती अधिकच पसरली. सर्वांच्या आग्रहावरून Devotion and the Master 'भक्ती आणि गुरू' या विषयावर एक जाहीर व्याख्यान झाले. इथे स्वामीजींचा मुक्काम फार थोडा होता. एका इंग्लिश बोटीने ते नागासकीला आले. इथे बुद्ध मंदिरे होती. स्वामीजींच्या भगव्या वेषामुळे त्यांचे या देवळात चांगलेच स्वागत झाले. इथे स्वामीजी दोन दिवस होते. या अवधीत जपानची भौगोलिक, औद्योगिक, आणि धार्मिक माहिती मिळविली. जपानी रीतीरिवाज खाणे पिणे यांचाही परिचय करून घेतला. बुद्ध मंदिरात बुद्धाचे तत्त्वज्ञान या विषयावर आख्यान झाले. त्यावेळी काही बौद्ध तत्वज्ञ उपस्थित होते. या व्याख्यानाचा त्यांच्यावर बराच परिणाम झाला. स्वामीजी नागासकीला असेपर्यंत त्यांनी त्यांची संगती सोडली नाही. त्यांच्याकडून जे शिकण्यासारखे होते ते त्यानी शिकून घेतले. एक बुद्ध गुरू म्हणाले – मी ज्या तत्त्व चिंतनात होतो, सबंध आयुष्य घालवूनही ज्याचा मला उलगडा झाला नव्हता तो स्वामीजींच्या एका व्याख्यानातून आणि त्यांच्या आचरणावरून मला प्रतीत झाला. स्वामीजी आपल्या वेषामुळे त्याना बुद्ध भिक्षुच वाटत. त्यामुळे बुद्ध मंदिरात सहज प्रवेश मिळे. तेथील लोकात मिसळता येई. जपानचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यापूर्वीच जपानचे चित्र सहजपणे स्वामीजींना उभे करता आले. नागासकी येथे स्वामीजींचा जो सत्कार झाला ती बातमी वृत्तपत्राद्वारे सर्वत्र झाली. याकोहोमला स्वामीजी पोचण्यापूर्वीच त्यांच्या स्वागतासाठी तेथील भारतीय नागरिक, बौद्ध तत्त्वज्ञ बंदरावर उपस्थित होते. याकोहोमला शेठ वासियामळ या हाँगकाँग येथील व्यापाऱ्यांचे दोन प्रतिनिधी बोटीवर स्वामीजीना घेण्यासाठी आले होते. बोट बंदराला लागताच या दोनही संन्यासांचे स्वागत झाले. वासियामळचे प्रतिनिधी पुढे होऊन शेठजीचे पत्र स्वामीजीना दिले. त्याप्रमाणे त्या दोघांना प्रतिनिधींनी आपल्या घरी नेले.

स्वामीजी म्हणाले - जपानी लोक आतिथ्यशील, उदार, व उद्योगप्रिय आहेत. मी परक्या देशात आलो असे वाटले नाही. एक दिवस याकोहोमला राहून ते टोकियोला आले. ते तिथे तडक इण्डो जपानी क्लबकडे गेले. तिथे पूरणसिंग यानी त्यांचे स्वागत केले. ते भारतीय होते. व उच्च शिक्षणासाठी ते इथे आले होते. पूरणसिंगाशी बोलताना कळून आले की इथे धर्मपरिषद वगैरे काही नाही. स्वामीजी म्हणाले. भगवंतानी हिमालयातून लाहोर आणि लाहोरहून जपानला आणले. भगवंताची काय योजना आहे कळत नाही. पूरणसिंगाना बुद्ध विश्वविद्यालयात व्याख्यानाला जावयाचे होते. स्वामीजीना पण त्यानी बरोबर नेले. व्याख्यानाचे वेळी पूरण सिंगानी सांगितले की भारतातील एका महान धर्मज्ञांनाचे माझ्या ऐवजी आज आपण त्यांचे विचार ऐकावेत.

स्वामीजींचा परिचय करून दिला. पूरणच्या विनंतीप्रमाणे स्वामीजीनी व्याख्यान दिले. - व्याख्यानाला अन्य देशांतील अभ्यासू देखील उपस्थित होते. स्वामीजींचे दीडतास भाषण झाले. श्रोते त्यांच्या विचार धारेबरोबर तल्लीन झाले होते. व्याख्यान संपल्यावर तेथील एक मोठे पंडित कान्झो युफीयुरा यांचे स्वामीजींच्या भाषणाचे समारोपाचे भाषण झाले. स्वामीजींच्या भाषणाने ते प्रभावित झाले होते. ते म्हणाले भारतात इतके प्रचंड ज्ञान भरले आहे याची मला आज कल्पना आली. आमच्या देशाच्या भोवती पाण्याची भिंत परमेश्वराने निर्माण केले आहे. ती ओलांडण्याच्या प्रयत्न मी कधी केला नाही. आता मला वाटते आपण भारतात जावे. तेथील ज्ञान प्राप्त करून घ्यावे. भारताबद्दल जपानी विद्यार्थ्यांना पण प्रेम वाटू लागले. व्याख्यान आटोपल्यावर पूरणसिंग व स्वामीजी क्लबमधे परत आले. शिकागो येथे धर्मपरिषद झालेल्या वृत्तग्रंथाचे दोन भाग पूरण यानी स्वामीजीना भेटी दाखल दिले. हे ग्रंथ मिळताच स्वामीजीना आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी छत्रे यांच्या सर्कशीचा प्रयोग पाहण्यासाठी स्वामीजी पूरण बरोबर गेले. त्या ठिकाणी टोकियो इंपीरिअल युनिव्हर्सिटी येथे असणारे टाकाकुत्स याजकडे स्वामीजीना भोजनास बोलावले गेले. सर्कस उशीरा संपली परतण्यासाठी वाहान मिळेना क्लबही बरेच लांब होते. पूरण व स्वामीजी चालत निघाले.

दुसऱ्या दिवशी टाकाकुत्स यांजकडे स्वामीजी भोजनास गेले. त्यांचे अतिथ्य पाहून स्वामीजींना बरे वाटले. जेवण व अनेकविध गप्पा झाल्या. टाकाकुत्स अनेक देशात प्रवास केलेले अनेक विद्वान लोकांच्या परिचय असलेले विद्याविभूषित गृहस्थ होते. स्वामीजींच्या विद्वत्तेने त्याना मोहून टाकले. पूरणला त्यांनी बोलून ही दाखविले. संध्याकाळी कॉमर्स कॉलेजमधे स्वामीजींचे व्याख्यान होते. व्याख्यानाचा विषय यशाचे रहस्य (Secret of Success) व्याख्यान खुल्या मैदानावर झाले. तेथे भारतीय, जपानी, अन्यदेशीय लोक, विद्यार्थी इत्यादी आले होते. सर्वांनाच स्वामीजींचे व्याख्यान आवडले. वृत्तपत्रांनी बरीच स्तुती केली. या व्याख्यानात अत्यंत सोप्या भाषेत मनुष्य मात्राची नैसर्गिक अवस्था, त्याच्यावर येणाऱ्या कृत्रिम अकृत्रिम आपत्ती या सर्वांना तोंड देऊन आपल्या ध्येयाशी पोचण्याची सफलता याचा उत्कृष्ट उहापोह केला. ते म्हणाले दिवा जळतो दुसऱ्यांना प्रकाश देतो, प्रत्येकाने आपले सर्व प्रकारचे सामर्थ्य खर्च करून परोपकार करण्याचा प्रयत्न करावा. तुम्ही दुःखी झालात तरी दुसऱ्याना सुख द्या. यात कसूर करु नका. नाहीतर मानव्यतेचा मृत्यू होण्याची शक्यता आहे. शरीर आळसावू नका. आळस टाकून नित्य उद्योगरस राहा. तुमच्या यशाचे सर्व रहस्य तुमच्या आचरणात साठविले आहे.

तुमच्याकडे किती आहे यावर नव्हे; तर जे आहे त्याचा उपयोग कसा करता, यावर आनंदीपण ठरते. - टॉम

दुसऱ्या दिवशी पूरण बरोबर बेरॉन पैबोकांदो यांच्याकडे गेले. स्वामीजींचे उत्तम अतिथ्य झाले. तत्त्वज्ञान व दैनंदिन व्यवहारावर गप्पा चालू झाल्या. कांदोने आपल्या मुलाला व पत्नीला स्वामीजींचे बोलणे ऐकण्यासाठी बोलावले. कांदो म्हणाले – स्वामीजी आपण संन्यास का घेतला? स्वामीजी म्हणाले हा मोठा संसार करावयाचा म्हणून छोट्या संसाराचा त्याग केला कांदोना समाधान वाटले. पूरण सिंगावर बराच परिणाम झाला. ते स्वत: शीख होते स्वामीजींच्या भाषणाचा इतका परिणाम झाला घरी येताच त्यांनी मुंडन करून घेतले. पांढरी वस्रे धारण केली. स्वामीजींचे वास्तव्य जपानमध्ये पंधरा दिवस होते. तेवढ्या अवधीत त्यांनी जपानी लोकांचे फार मोठे प्रेम संपादन केले. ते स्वामीजींना पवित्र मानीत.

जपान मधील वास्तव्य संपवून स्वामीजी छत्रे सर्कस जाणाऱ्या बोटीने ते अमेरिकेच्या प्रवासास निघाले. नारायण स्वामींना तेथूनच परतण्यास सांगितले. ब्रह्मदेश इंडोचायना इथे भारतीय तत्वज्ञानाचा परिचय करून देत नारायण स्वामी सिलोनाला आले. तिथे तीन महिने वास्तव्य करून लंडनला १९०३ साली दाखल झाले. जवळ एक पैसाही नसताना हा प्रवास नारायन स्वामींनी केला होता.

**श्री. श्रं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३२०३०

•••

(मलपृष्ठ २ वरून – संपादकीय)

अंतकरणातून पाझरणारं वात्सल्य हे असायचं. शेंगाळे, थालिपीठ, वरण फळे, शेवग्याचं पिठलं... सर्व काही या इनग्रेडियंटमुळे पौष्टिक व्हायचं. शामच्या आईचं सगळं यश होतं ते तिच्या श्यामबरोबर मोठं होण्याला. तिच्या दिवसाचा सूर्य उगवला तोच मुळी श्यामचा चेहरा घेऊन. याउलट आजच्या पिढीचं आहे. धावत राहणारी पिढी व तिचा सूर्य उगवतो तोच मुळी गुडघ्यात मान घालून उदासीनता बरोबर घेत. गती म्हणजेच प्रगती मानणाऱ्या या पिढीला गती ही अधोगती असू शकते हे कोण सांगणार! आपलं मूल, आपलं करिअर, आपला 'पार्टनर' या सर्वांमुळे व्यक्तिस्वातंत्र्य व स्वातंत्र्य यातला फरक पुसून टाकला आहे. मूल म्हणजे डेड इन्व्हेस्टमेंट असते? मूल म्हणजे मला हवं, तुला नको असा भाकरीचा तुकडा असते?

आजचे ते सगळेच वाईट असा तक्रारीचा सूरही काहींना यातून ऐकू येईल पण ही तक्रार, हे निरीक्षण झाकून न ठेवता येणारं, प्रखर वास्तव आहे.

श्यामच्या आईचं मोठं यश होतं ते ती त्या काळाची प्रतिनिधी होती. 'दॅट ओल्ड फेलो' वाटणाऱ्या आजच्या पिढीला 'ती' आई हवी आहे, त्या आईचे संस्कार हवे आहेत. आई बापाचे फंडाचे पैसे खाऊन त्याच्या वनरूम किचन मध्ये रमणाऱ्या आणि आईबाबांना घराबाहेर काढणाऱ्या पिढीचा भारत हा समाज नाही खरेतर जगात असा समाज नसावा. डोक्यात चुकीची हवा गेल्याने चौफेर उधाणलेल्या वासरांप्रमाणे आजची पिढी वाहवत चालली आणि गरज आहे ती आईची!

**– मोहन पाठक**

•••

# महत्त्व वाचन संस्कृतीचे

*वाचनाचे महत्त्व याबद्दल विचार करता करता सुचलेल्या विचारांचे हे शब्दांकन आहे. वाचनाच्या संदर्भात खूप लिहिण्यासारखे आहे. अन्य कोणाला आपले विचार शब्दबद्ध करायचे असतील तर अवश्य करावे व दिशाकडे पाठवावेत. योग्य लेखांना प्रसिद्धी मिळेल.*

*दिसामाजी काहतिरी ते लिहावे।*
*प्रसंगी अखंडित वाचित जावे।। रामदास स्वामींचे म्हणणे आहे.*

किंवा

'वाचाल' तर 'वाचाल' हे अगदी खरं आहे. यावर मी एक प्रतिज्ञा वाचली आहे. जसे आपण शाळेत प्रतिज्ञा म्हणतो. भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत, अगदी त्या सारखीच, काही ओळींचा उल्लेख करते - कारण आयुष्य जसं सगळ्या टप्प्या टप्प्यांवर बदलतं, प्रत्येकाची वागणूक जशी त्याच्या वयानुसार घडते तसेच वाचन हो ही एक त्याची महत्त्वाची पायरीच होते. पुस्तकाशिवाय मानवाचा जन्म वाया आहे.

प्रतिज्ञा - *वाचन हा देखील आमचा श्वास आहे।*
*ग्रंथ संग्रह आमचा ध्यास आहे।।*
*सारे उत्तम ग्रंथ, आमचे गुरू अन्*
*आमचे मित्र आहेत।।*

जीवनात अनेक परंपरा, संस्कृती असतात, जसे भारतीय संस्कृती, तशी वाचन संस्कृती आम्ही महत्त्वाची मानतो. अगदी लहान वयातच आपण आपल्या आईवडिलांबरोबर, गुरुजनांबरोबर पुस्तकाचे वाचन सुरू करतो, गोडी निर्माण झाली काही मोठी पुस्तके हळूहळू नजरेखालून घालतो. एवढी मोठी ग्रंथ संपदा, कशी काय तयार होते, माणसे इतके ग्रंथ इतकी पाने, इतक्या भाषांमध्ये काय काय लिहून जातात एक आश्चर्यच आहे. मोठेमोठे कवी, लेखक अजूनही लेखन, वाचन करत आहेत, त्यांचा अभ्यासही केला जातो, काही विषयांवर मोठाल्या प्रबंधाचे वाचन करून, संशोधन केले जाते. या वाचनातही समूहाने बरेच लोक अनेक विषय हाताळतात, वाचन करतात. भगवत्गीता, रामायण, महाभारत, पोथी पुराणे किती नावे घ्यावी, आठवता आठवत नाहीत. मुखोद्गत वाणीने लोक मोठमोठ्या सभा गाजवतात, टाळ्या घेतात.

हल्ली हल्ली वाचलेलं मला आठवतयं, कवी मंगेश पाडगावकर यांनी कुसुमाग्रजांच्या कवीता वाचून, काव्य करायला सुरुवात केली. या मंडळींचे वाचन, अभ्यास फारच मोठा आहे. सारं यांच्या ओठांवरच असतं.

वाचनाला मर्यादा नाहीत. जसे भाषा अनेक प्रकारच्या, तसेच वाचन अनेक भाषांचे असते. प्रत्येक माणूस आपल्या मातृभाषेतून वाचन करत असतो. म्हणून वाचनाला 'संस्कृती'चा दर्जा दिला आहे पुष्कळ ग्रंथ, पुस्तके आपण वाचत असतो, काही आवडतात, काहींमध्ये थोडेसे समजते. तरीही मोजकेच वाचण्यानेही आपण मनाशी त्यांचा विचार करत राहतो.

बघाना, वाचनाने 'उत्तुंग शिखर' माणूस गाठतो, हे फार मोठे साधन व माध्यम आहे. किती घ्यायचे म्हटले तरी ते अपुरेच आहे. एखादी वेळ अशी येते, अरे हे पुस्तक, लेख वाचताना संपूच नये, पोट भरत नाही. केवढा मोठा आवाका यांत आहे.

आपलं आयुष्य, वय, अनुभव या साऱ्या गोष्टीची सुरुवात या पुस्तकांतून, वाचनातून होते. ही एक साखळी गुंफलेली आहे. अशी - आपली एकाग्रता असेल तर

---

जी व्यक्ती कोणावरच विश्वास टाकत नाही, ती स्वत:देखील कोणाचा विश्वास संपादन करीत नाही.

अभ्यास होतो, त्यासाठी स्थिर बसावे लागते, चिकाटी निर्माण व्हावी लागते, नंतर हळूहळू आपला व्यक्तिमत्त्वाचा आवाका वाढू लागतो. ध्येयनिश्चिती, संभाषण कौशल्य, आरोग्याचा विचार, घेतले जाणारे निर्णय इ.

आपण लिखाण, वाचन याने मोठे होत असतो यातही विद्यार्थी दशा म्हणजे परीक्षा. या प्रकाराचे वाचून विनिमय, बौद्धिक ज्ञान देणे. विचाराची देवाणं घेवाण करणे, कारण आपण विद्यार्थीच असतो, ज्ञान कधीही पूर्णत्वाने मिळत नाही,

वाचनाला जसे 'संस्कृती' म्हटले आहे, तसेच त्याला 'कौशल्य' हेही नाव दिले आहे. त्यातून अनेक गोष्टी उलगडतात. वाचकाची शरीर प्रकृती उत्तम असणे हे वाचन कौशल्याचे महत्वाचे अंग आहे त्याप्रमाणे मानसिक स्थिती, शारीरिक हालचाल, नजरेचा आवाका असणे, वाचन मोठ्याने करणे किंवा मनात वाचणे वगैरे, त्यात एकाग्रता महत्वाची. अति वाचन करणारे असामान्य लोक १५०० / १६०० शब्द प्रति मिनिटे वाचतात असे म्हणतात. स्वामी विवेकानंद, डॉ. आंबेडकर यांचा वाचनाचा वेगही अफाट होता. विषयाचे पूर्वज्ञान असल्यास तो विषय समजण्यास सोपा जातो. शब्दभांडार वाढवण्यास भाषा कोणतीही, विषय कोणताही असल्यास मदत होते. किंवा काही कळूही शकत नाही, वाचनाचा वेग कमी होईल. यासाठी आसनव्यवस्थाही फार महत्त्वाची आहे.

वाचनाच्या गतीलाही यात स्थान आहे. भराभर वाचन करण्याने आकलन कमी होते पण जेवढे होईल त्याचा ठसा अंतर्मनात् चांगला उमटेल. परीक्षेचे वेळापत्रक, रेल्वे बसचे वेळापत्रक यातही वेगळे महत्त्व लक्षात घेऊन वाचावे लागते.

आता प्रतिज्ञेमध्ये पुढे काय आहे ते थोडेसे मातृभाषेवर आमचे प्रेम आहे. मराठी भाषेच्या समृद्ध अन् विविधतेने नटलेल्या साहित्याच्या परंपरेचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

त्या परंपरांचा पाईक अन् वाचक होण्याची पात्रता आमच्या अंगी येण्यासाठी, आम्ही सदैव आस्वादक वाचक होऊ. मायबोलीचा, गुरुजनांचा वडीलधारे अन् साहित्यिकांचा आम्ही सदैव मान ठेवू.

काही वेळा विचार करताना किंवा मोठमोठ्या ग्रंथसंग्रहालयातून फिरताना असं लक्षात येत की, एवढी पुस्तके कुठून कशी येतात, किती लेखक कवी यात आहेत, त्यांची गटवारी केलेली असते पण त्याचा अंदाज आपण लावू शकत नाही. मासिकांमध्येही भरपूर विचार, अभ्यास आरोग्य यांचा मागोवा घेतलेला असतो. अगदी वास्तुशास्त्रही त्यांतून सुटलेले नाही. महिनावारी अंक, दिवाळी अंक, मुलांसाठी खास सुट्ट्यांमधील अंक हेही काही कमी नाहीत. कोडी सोडवा हाही मजेचा, अभ्यासाचा, विचार करण्यासारखा छंद आहे त्यालाही वाचनाची जोड महत्त्वाची आहे.

वाचन कशासाठी? असा प्रश्न जर पडेल पण त्याचं उत्तर हे असं आहे - वाचन आपल्याला प्रेरणा देते, कठीण प्रसंगी धीर देते, मार्ग दाखवते, मेंदूला यामुळे तरतरी येते, आलेली मनाची मरगळ, निराशा, वैफल्याची भावना दूर होते. एखाद्याचे चरित्र वाचत असताना त्या लोकांनी कठीण अवस्थेत काढलेला मार्ग, त्यांचे असलेले उद्दिष्ट यांची माहिती मिळते, किंवा आपण पुढील आयुष्यात ध्येय गाठण्यासाठी कशी वाटचाल करायची याबद्दल माहिती मिळते. छोट्या छोट्या गोष्टींच्या पुस्तकांपासून ते अगदी मोठ्यामोठ्या कादंबऱ्या, ग्रंथ मग ते कोणत्याही वर्गातले पुस्तक असो, त्याचे वाचन करत राहिले तर रोज आपण निश्चयाने पुस्तक समोर घ्यायची सवय व ईच्छा दोन्ही साध्य होते. वाचनाची आवड निर्माण होते.

'वाचन संस्कृतीच्या महत्त्व' या विषयामुळे बरेच विचार करुन लिहिणे, अत्यंत गरजेचे होते, वाचन जरी करत असलो तरी शब्द आठवतात असे नाही, नक्की कागदावर काय उतरवायचं, असा प्रश्न पडतो. आपण चुकीचे लिहिले तरी पंचाईत, असे वाटते. पण अनेक

'उभे राहून आवाज उठवण्यासाठी धैर्य लागते. गप्प बसून ऐकण्यासाठीही धैर्य लागते.' - विन्स्टन चर्चिल

विषयांचे लिखाण आणि त्यांचं वाचन करणं म्हणजे ग्लास अर्धाच भरलाय की अर्धा रिकामाच आहे! असं म्हणायची वेळ येते. विषय एकदम आवडला, विचार करण्यासारखा आहे. लिखाणातून याचं उत्तर बरोबर देता आलं कां? असा प्रश्न मी मनाला विचारला. आपण थोडेफार ज्ञानी असतो, म्हणून लेखन, वाचन, अभ्यास करतो. एकमेकांना विचार देतो, राग व्यक्त करतो. पण जे अगदी अशिक्षित असतात, त्यांना आपणच शिकवायचे असते, त्यातूनच काहीजण जिद्दीने, एखाद्या ध्येयाने, झपाट्याने शिक्षणाचा ध्यास घेऊन बरेच काही करतात.

शिक्षण, वाचन, आचार - विचार यांची देवाण घेवाण करायची म्हटली तरी जीवन अपुरे पडेल, सुख, दुःखे, उलगडायला पुस्तकांचे वाचन हा मोठा आधार आहे. सगळ्याच्या सीमा पार करायच्या असतील तर, 'ग्रंथ' हेच आपले गुरु आहेत. यावरुन 'वाचन संस्कृती' ही किती महत्त्वाची, अग्रगण्य आहे, कितव्या क्रमांकावर तिला बसवायचं हे आपणच ठरवतो.

आपला विकास, आपल्या सर्व संस्कृतींचा विकास ही ग्रंथसंपदा करत असते, आपल्याला खाद्य पुरवणारे हे ग्रंथ जोवर जग आहे, तोवर त्यांच्यावर तुमचं सारं जीवन अवलंबून आहे, जीवनाचे सारे हिशोब त्यात आहेत. असो आता उरलेली प्रतिज्ञा पूर्ण करुन लेखन संपवते -

*सर्व भाषा भगिनींशी स्नेह राखण्याची*
*आम्ही प्रतिज्ञा करत आहोत. ।।*
*वाचन लेखन, वैश्विक भाषासमृद्धी*
*यातच मनुष्यमात्राचं आम्ही सौख्य मानतो ।।*
*जय लेखन, जय वाचन, जय मायबोली ।।*

**सौ. विद्या वसंत फडके**
रुम क्र २, एव्हर ग्रीन सोसायटी (पूर्व)
विलेपार्ले - ४०० ०५७

●●●

## नियोजन मृत्यूचे

माझे आयुष्य साधारणपणे सरासरी ७० वर्षांचे आहे असे मानले, तर मरण त्या तुलनेत क्षणांतच येते. मग आपण तुलनेने सोपे असलेल्या मरणापेक्षा ७० वर्षांचे खडतर आयुष्य का निवडतो? तर आपल्या प्रत्येकामध्येच जगण्याची एक प्रकारची ऊर्जा आणि आकर्षण असते. मरणानंतर हे सर्व क्षणात संपते, आणि मग मृत्यूनंतर माझे नेमके काय होते, या विचारांनी खूप गोंधळ उडतो. तर मग अनेकदा जगण्याची सहनशक्ती संपली, जगणं असह्य झालं, की माणूस आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो. त्यातूनच सहज आलेलं मरण आणि मी ओढवून घेतलेला मृत्यू, यांमध्ये नेमका काय फरक आहे, याबाबत ऊहापोह सुरू होतो. खरं म्हणजे प्रत्येकालाच हवं तसं जगण्याचा अधिकार आहे. आपल्या मृत्यूनंतर माझ्या जवळच्या लोकांचे काय होईल, या विचारांनीच व्यक्तीचा मरणाचा अधिकार काढून घेतला जातो. म्हणूनच,

- माझ्या आयुष्याचे अशा प्रकारे नियोजन करणे आवश्यक आहे, की मरणाच्या वेळेस आयुष्य मनासारखे न जगल्याची खंत राहू नये.
- आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर वेगवेगळे नियोजन करणे आवश्यक आहे.

- संग्रहातून

'दुसऱ्यांच्या हक्कांचा मान राखणे, त्यांचे अधिकार त्यांना देणे हे प्रत्येकाचे नागरिक म्हणून देशाप्रती असलेले कर्तव्य आहे.' - जॉन एफ. केनेडी

# शिवमानसपूजा

श्रीमदाद्य शंकराचार्य विरचित

*दिशाचे हितचिंतक व वाचक श्री. नीलकण्ठसुत यांनी अनेक स्तोत्रे मराठीत वृत्तबद्ध केले आहेत. आज अशा प्रकारची कविता फारशी वाचनात येत नाही संस्कृत काव्याचा मराठी काव्यानुवाद या दृष्टीने या स्तोत्राचा वाचकांनी विचार करावा. सुरुवातीला मूळ संस्कृत आहे. - संपादक*

रत्नै: कल्पितमासनं हिमजलै: स्नानं च दिव्याम्बरं
नानारत्नविभूषितं मृगमदामोदांकितं चन्दनम्।
जाती चम्पक बिल्वपत्ररचितं पुष्पं च धूपं तथा
दीपं देवदयानिधे पशुपते हत्कल्पितं गृह्यताम् ।।१।।

रत्नासन कल्पिले शिवप्रभो शीतल-जल-स्नाना
रत्नाभूषित दिव्य भर्जरी वस्रे परिधाना
गंधकस्तुरी - चंदन, गंधित सुमने बिल्वदलें
धूपदीप स्वीकार करा प्रभु, मानसनिर्मियले ।।१।।

•• •• ••

सौवर्णे नवरत्न खण्डरचिते पात्रे घृतं पायसं
भक्ष्यं पंचविधं पयोदधियुतं रम्भाफलं पानकम्।
शाकानामयुतं जलं रुचिकरं कर्पूरखण्डोज्ज्वलं
ताम्बूलं मनसा मया विरचितं भक्त्या प्रभो स्वीकुरु ।।२।।

माणिक मंडित - सुवर्णपात्री पंचखाद्य खीर
तूप दूध दहि मिष्टान्नासह पेय, फलाहार
कर्पुरगंधित निर्मल जल अन् तांबुल स्वीकारा
भक्तीने अर्पितो मानसी तुम्हास देववरा ।।२।।

•• •• ••

छत्रं चामरयोर्युगं व्यजनकं चादर्शकं निर्मलं
वीणा भेरि मृदंग काहल कला गीतं च नृत्यं तथा।
साष्टांग प्रणति: स्तुतिर्बहुविधा ह्येतत् समस्तं मया
संकल्पेन समर्पितं तव विभो पूजां गृहाण प्रभो ।।३।।

छत्र चामरें विंझण दर्पण नानाविध वाद्ये
गायन वादन नृत्य मनोहर वंदन स्तुतिपद्ये
संकल्पे हे सफल निर्मिले अर्पण प्रभुचरणी
स्वीकारावी विनम्र माझी शशिधर मनधरणी ।।३।।

•• •• ••

आत्मा त्वं गिरिजा मति: सहचरा: प्राणा: शरीरं गृहं
पूजा ते विषयोपभोगरचना निद्रा समाधिस्थिति:।
संचार: पदयो: प्रदक्षिणविधि: स्तोत्राणि सर्वागिरा
यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम् ।।४।।

शिवान्तरात्मा मती पार्वती शिवगण मम प्राण
देह शिवालय, भोग अर्चना, निद्रा तव ध्यान
अखिला वाचा ऋचा, चालणे प्रदक्षिणा देवा
करि मी जे जे कर्म सर्व ते भक्ती तव शर्वा ।।४।।

•• •• ••

करचरणकृतं वाक्कायजं कर्मजं वा
श्रवणनयनजं मानसं वाऽपराधम्।
विहितमविहितं वा सर्वमेतत् क्षमस्व
जयजयकरुणाब्धे श्री महादेव शम्भो ।।५।।

काया वाचा मने किंवा जे करचरणी घडले
नेत्री श्रोत्री आचरणी वा विपरित आढळले
तथायोग्य की का नाकळे घडले वा केले
जय जय शंभो क्षमा करावी चरण कमल धरिले ।।५।।

- नीलकण्ठसुत, डोंबिवली

•••

# डॉ. आगरकर यांना संजीवराय सर्मा पुरस्कार

*विद्याप्रसारक मंडळाचे हितचिंतक व दिशामध्ये अभ्यासपूर्ण परिचय असणारी प्रवासवर्णने लिहिणारे डॉ. सुधाकर यांना मिळालेल्या पुरस्काराचा हा वृत्तांत - संपादक*

टाटा मुलभूत संस्थेच्या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रात कार्यरत असलेल्या डॉ. सुधाकर आगरकर यांना श्री. संजीवराय सर्मा पुरस्काराने गौरविण्यात आले. हा पुरस्कार सोहळा आंध्र प्रदेशातील रामचंद्रपरम येथे आयोजण्यात आला होता. रामचंद्रपुरम शहरातील रामानुजन गणित अकॅडेमीच्या प्रांगणात यासाठी भव्य शामियाना उभारण्यात आला होता. या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील अनेक गणितप्रेमी उपस्थित होते. मंत्रपठणाने सत्कार सोहळ्याला सुरुवात झाली. डॉ. आगरकरांना एका आसनावर बसवून त्यांच्यावर पवित्र पाणी शिंपडण्यात आले. त्यानंतर संस्थेच्या वतीने हार घालण्यात आला. सरतेशेवटी शाल, श्रीफळ देऊन त्यांना गौरविण्यात याशिवाय सुटाचे कापड आणि १०,००० रूपयांचे पाकीट त्यांना देण्यात आले. याबद्दल डॉ. आगरकर यांचे विद्या प्रसारक मंडळाच्या व दिशाच्या वतीने आम्ही अभिनंदन करतो.



रामानुजन गणित अकॅडेमी नेमके काय करते? संजीवराय सर्मा, ज्यांच्या नावाने हा पुरस्कार दिला गेला, त्यांचे कर्तृत्व काय? डॉ. आगकरांच्या नेमक्या कोणत्या कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांना हा पुरस्कार दिला गेला? असे प्रश्न वाचकांच्या मनात पडणे स्वाभाविक आहे. या तीनही प्रश्नांची उत्तरे या लेखात देण्यात आलेली आहेत. प्रथम पहिल्या प्रश्नाकडे वळू या.

श्रीनिवास रामानुज हे भारतीय नाव आंतरराष्ट्रीय क्षेत्रातदेखील मानाने घेतले जाते. केवळ ३२ वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले. या अल्पावधीत त्यांनी गणितात मोलाची भर टाकली. त्यांनी आपल्या वहीत नोंदून ठेवलेल्या गणितीय कोडी सोडविण्याचा अजूनही प्रयत्न चालूच आहे. अशा या थोर गणितज्ज्ञाच्या नावाने आंध्र प्रदेशातील काही गणितप्रेमी मंडळींनी एक संस्था काढली. समाजामध्ये गणितीय साक्षरतेचा प्रसार करणे, गरजू मुलांना गणिताच्या पुस्तकांचा पुरवठा करणे, प्रज्ञावंत मुलांना प्रज्ञेची जोपासना करण्यासाठी संधी मिळवून देणे अशाप्रकारची कामे या संस्थेतर्फे चालविली जातात. आंध्रप्रदेशातील दक्षिण भागात असलेल्या रामचंद्रपुरम या गावी या संस्थेची भव्य इमारत बांधण्यात आलेली आहे. या इमारतीत एक वाचनालय असून गणित विषयावरील अनेक दुर्मिळ पुस्तकांचा तेथे संग्रह करून ठेवलेला आहे. ज्यांच्या घरात मार्गदर्शन करायला कोणी नाही किंवा ज्यांना पैसे भरून शिकवणी वर्गांना जाणे शक्य नाही अशा

'लोक आपल्याला काय समजतात यापेक्षा आपण काय आहोत, हे अधिक महत्त्वाचे असते.' - जवाहरलाल नेहरू

विद्यार्थ्यांना येथे मदत केली जाते. त्याचबरोबर शालेय स्तरापासून ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत गणित चाचणी घेतली जाते. सुरुवातीला या परीक्षेला रामचंद्रपुरम आणि आजूबाजूच्या गावातील विद्यार्थीच बसत असत. परंतु आता परीक्षेचे लोण केवळ आजूबाजूच्या जिल्हातच नव्हे तर आजूबाजूच्या राज्यांतदेखील पसरले आहे. या वर्षी साठ हजार विद्यार्थी या परीक्षेला बसले होते. त्यांतील गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचा डॉ. आगरकरांच्या हस्ते याच समारंभात सत्कार करण्यात आला.



श्री संजीवराव सर्मा हे जन्मापासून आंधळे होते. परंतु त्यांना गणितात खूप आवड होती. आकडेमोड करणे हा त्यांचा छंद. कितीही कठीण गणित असू दे ते तावडतोब सोडवीत असत. त्यांना हे कसे जमत असे याचा शोध घेण्याचा प्रयत्न कित्येकांनी केला. पण यश आले नाही. वेळ मिळेल तेव्हा संजीवराव रामानुजन अकॅडेमीत येत आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत. त्यांच्यामुळे अनेक विद्यार्थी गणिताकडे आकर्षिले गेले. त्यांतील अनेकजण आता देशात आणि परदेशात उच्च पदावर काम करीत आहेत. संजीवराय यांच्या मृत्युनंतर त्या सर्वांनी निधी गोळा करून त्यांच्या नावाने पुरस्कार देण्याची योजना आखली. गणित अध्यापनात मोलाची कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस हे पारितोषिक देण्यात येते.

डॉ. आगरकर हे १९७६ पासून होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रात विज्ञान आणि गणित शिक्षणात संशोधनाचे कार्य करीत आहेत. दुर्बल गटातील विद्यार्थ्यांचे शिक्षण हा त्यांच्या संशोधनाचा विषय आहे. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार विज्ञान आणि गणित हे दोन्ही विषय शालांत परीक्षेला अनिवार्य करण्यात आले. हे विषय घेऊन विद्यार्थ्यांची पहिली तुकडी महाराष्ट्रात प्रथम १९७५ ला शालांत परीक्षेला बसली. त्यावर्षी विद्यार्थी नापास होण्याची संख्या खूप मोठी होती. त्यांच्या नापासीचे कारण हा विषय होता. त्यानंतरच्या काळात या समस्येचा सखोल अभ्यास करण्याचा ध्यास डॉ. आगरकरांनी घेतला. मुंबई महापालिकेच्या शाळेत शिकणारे ४० विद्यार्थी घेऊन त्यांनी संशोधनाला सुरुवात केली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या समजवून घेतल्यानंतर त्यांनी त्यावर उपाययोजना करण्यासाठी उपचारात्मक पद्धतीचा विकास केला. या पद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांच्या गुणांत भरघोस वाढ करता येते हे त्यांनी ६ वर्षांच्या अथक परीश्रमाने दाखवून दिले.

उपचारात्मक अध्यापन पद्धतीचा विकास करून डॉ. आगरकर थांबले नाहीत. या पद्धतीचा खेड्यापाड्यात प्रसार करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात प्रकल्प घेतले. त्यानंतर आदिवासी विभागाने चालविलेल्या आश्रमशाळेत त्यांनी आपल्या पद्धतीची उपयोगिता सिद्ध केली. त्यांच्या या संशोधनावर आधारित अनेक लेखांचे आणि पुस्तकांचे प्रकाशन त्यांनी केलेले आहे. विशेष उल्लेख करण्यासारखी पुस्तके म्हणजे उपचारात्मक बीजगणिताचा चार पुस्तकांचा संच. हा संच होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राने प्रकाशित केला असून अल्प दरात उपलब्ध आहे. सध्या ते उपचारात्मक माध्यमिक भूमिती

'जग बदलावं असं वाटतं असेल, तर तुम्हांला स्वतःला आधी बदलावं लागेल.' - महात्मा गांधी

या विषयावरील साहित्य लिहिण्यात गुंतलेले आहेत. त्यातील पहिले पुस्तक लवकरच प्रकाशित केले जाणार आहे.

डॉ. आगरकरांनी उपचारात्मक गणितात केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांना संजीवराय सर्मा पुरस्कार देण्यात आला. पुरस्काराला उत्तर देताना गणितीय साक्षरता या विषयावर डॉ. आगरकरांनी आपले विचार मांडले. लिहण्यावाचण्याची साक्षरता जरी वाढली तरी गणितीय साक्षरता मात्र समाजात फारशी वाढली नाही याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. या साक्षरतेच्या अभावी जाहिरातदार आपल्याला कसे फसवितात याची काही उदाहरणे त्यांनी आपल्या व्याख्यानात दिली. एका महाराष्ट्रीयन माणसाचा आंध्र प्रदेशात झालेल्या या सत्काराबद्दल आम्ही आनंद व्यक्त करतो आणि महाराष्ट्रातील संस्थांनी देखील डॉ. आगरकरांच्या कामाची नोंद घ्यावी, असे आवाहन करतो.

प्रतिनिधी

●●●

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

## *विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर*



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दुःखतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दुःखावर जय मिळवता यावा,
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावंस ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सांत्वन केलं नाहीस तरी,
माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी,
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दुःखाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये,
एवढीच माझी इच्छा.

गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*उषासूक्ताच्या संदर्भात केलेले विवेचन - संपादक*

**महायोगी अरविंद घोष :**

माझे परम मित्र श्री दि. वि. असेरकर ह्यांनी मला सुचविले की महायोगी अरविंद घोष (पाँडिचरी आश्रम) ह्यांच्या वैचारिक, सामाजिक अध्यात्मिक (Spirituality) शास्त्राबद्दल व मुख्यत: भारतीय संस्कृतीतील विस्मृतीत गेलेल्या वैश्विक ज्ञानाबद्दल केलेल्या विलक्षण महत्वाच्या कामगिरीबद्दल सोप्या शब्दांत एक 'छोटेसे निवेदन' करा. हे छोटेसे बंधन पाळणे कठीण आहे. प्रयत्न करू या!!

**दिव्य जीवन उषा सूक्त :**

अरविंद नाव डोळ्यासमोर आले की त्यांच्या महत्त्वाच्या "The Life Divine" ह्या पुस्तकाची हमखास आठवण होते. 'मानवी जीवनाचा हेतू' दिव्यत्वाकडे प्रवास हा आहे. मग, मानवाच्या सध्याच्या 'पशुवृत्ती सादृश्य' रूपाच्या आत्म्याचा (कॉंशसनेसचा मार्ग भगवद्गीतेतील 'पुरुषोत्तम स्तरावर' किंवा प. पू. गुरु गोळवलकर ह्यांच्या 'परिपूर्ण मानव' किंवा संत ज्ञानेश्वरांच्या 'सज्जनांच्या मंदियाळी पर्यंत स्वरूपाशी', प्रत्यक्षात कसा व कोणत्या कार्याने किंवा 'यज्ञकृतीने' होईल याचा विस्तीर्ण खल व मार्ग ह्या १०७० पानांतून कथित केला आहे. ही आवृत्ती Reduced Facimile Edition - 1983, 86, 88 अशी आहे.

**उषा सूक्त ऋग्वेद :**

इंग्रजी भाषेत हे पुस्तक लिहिले आहे. पण, लक्षांत ठेवण्यासारखी मुख्य गोष्ट ही आहे कीं त्या पुस्तकाच्या पहिल्या पानावरच ऋग्वेदातील ऋषी कुत्स अंगिरस ह्यांच्या (१.११३.८.१०) ह्या ऋचेच्या सूक्ताच्या इंग्रजी भाषांतरातील उल्लेख दिमाखाने केला आहे. ह्याला 'उषा सूक्त' असे नाव आहे. काय कारण असेल.

**अर्थाचा अनर्थ :**

ते समजणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ऋग्वेदातील अपौरूषेय ज्ञान 'श्रुती' तुल्य म्हणजे वैश्विक सत्याच्या स्तरावर आहे. त्याचा व त्यातील अध्यात्मिक ज्ञानाचा बोध मानवजातीला आजही झालेला नाही. पण, त्याचे अत्यंत सामान्य अर्थ लावण्यात आले आहेत. पश्चिमात्य पंडित, भारतीय पंडित व आधुनिक काळातले पंडित सातवळेकर ह्या सर्वांनी ह्या सूक्ताचे सामान्य अर्थ, म्हणजे साहित्यिक थाटाचे लावले आहेत. त्या सर्वांना रोज सूर्याच्या सकाळच्या उगवण्यातील दृश्ये ह्यांचे रसभरित वर्णन ऋषी करताहेत व त्यांतील काव्यात्म अलंकाराचा स्वाद व वर्णन करण्यात त्यांनी आपले विचार व लेखणी वापरली आहे. त्यामुळे वेदांच्या 'ब्रह्मज्ञानाचा' अनादर व त्यावर अन्याय होत आला आहे. हे माझे ठाम मत आहे.

**आध्यात्मिक गूढ सत्य अर्थ :**

पण, अरविंद यांना ह्या सूक्तात 'मानवाच्या पृथ्वीवरील प्रगतीचा गूढ. आध्यात्मिक मंत्र व दिशा सापडली. हा गूढार्थ पूर्ण जाणण्याकरिता व ही प्रगतीची दिशा सर्वार्थाने काय आहे. हे सांगण्याकरिता, ह्या महामानवाने आपल्या योगिक साक्षात्काराचा, सामर्थ्याचा उपयोग केला आहे. व त्यांचे श्रेष्ठ भगवान कृष्णासारखे मार्गदर्शन केले आहे. पण, ह्या दर्शनाला महर्षी व्यास ह्यांच्या प्रतिभेच्या निवेदनाची जोड हवी आहे.

---

'चुका करत व्यतीत केलेले जीवन काहीही न करता घालवलेल्या जीवनापेक्षा गौरवस्पद असते.' - जॉर्ज बर्नार्ड शॉ



महर्षी अरविंद

उषासूक्त हे ऋग्वेदाच्या १ ल्या मंडलात ११३ व्या अध्यायात सूक्त १ ते २० पर्यंत ऋचांनी व्यापलेले आहे. सामान्य बुद्धीच्या माणसाला, ही 'उषा' म्हणजे रात्री नंतर सूर्य पूर्णपणे उगवण्याच्या अगोदरच्या काळात आपली प्रकाश किरणे घेऊन येणारी पहाट व जिच्यामुळे हे जग पक्षी, पशू मानव व सर्व सृष्टी आपल्या जागृत जीवनाला दिवसाच्या कामांची सुरुवात करते एवढेच दिसले!! हे तर सामान्य कवी सदृश प्रतिभा दर्शन होय!!

पण, ह्या सूक्तांचा १-२० ऋचा पर्यंतचा पसारा एकत्र वाचल्यावर हे वरवरचे दृश्य सांगणे, हा ऋषी 'कुत्स अंगिरसाचा हेतू' नसून, त्याने मधून मधून पेरलेल्या सूचक शब्दांवरून, हा एक सांकेतिक गूढ ज्ञान जागृत करण्याचा हेतू आहे असे जाणवू शकेल!! पण, हे जाणवणे म्हणजे काय? हा फरक कोणता? हे नवे द्रष्टेपण आहे का?

**आधुनिक ऋषी नूतन द्रष्टेपण :**

योगी अरविंद काय म्हणतात व त्यांना काय पुरावे सांपडले हे पहाणे मोठे भाग्याचे ठरेल. नवीन अंतर्ज्ञानाची दिशा व शक्ति प्रदान करू शकेल!! पाहू या हे काय म्हणणे आहे!! ''वेदकालीन ऋषींनी पार्थिव उषेच्या सौंदर्याचा उपयोग उपमा देण्याकरिता केला व आपण वरवर अर्थाने ऋचा वाचल्या तर आपणास ती वर्णने पार्थिव उषेच्या आगमनाची वाटून, त्यातील 'खरा आध्यात्मिक अर्थ' समजणार नाही. पण, वर्णनात्मक प्रत्येक ऋचेत आपणास गूढ अर्थाच्या सूचना पेरून ठेवलेल्या आढळतात. आध्यात्मिक अर्थ म्हणजे शरीरधाऱ्या आत्म्याला त्याच्या पातळीवर व भाषेत प्राप्त होणारा अर्थ होय. तो प्राणी स्तरावरील मानवाच्या बुद्धीचा व इंद्रिय ज्ञानाचा नव्हे!

'' सूर्य हा दैवी सत्याच्या सोनेरी प्रकाशाबद्दलची पारंपारिक उपमा आहे. त्याचप्रमाणे, मानवी अज्ञानात दैवी प्रकाश उत्पन्न करणारी 'उषा' ही देवता आहे'' ही अरविंदांची 'नवीन प्रतिभादर्शनी' आहे!! ते पुढे म्हणतात-

ह्या अनंत 'सत्याच्या' दोन विरुद्ध बाजू आहेत. (Eternal Cosmic Realities) जिच्यापासून 'सर्व जगते' जन्मास येता, ती 'गाढ रात्र' ही **''अचेतनाची''** प्रतीक आहे. (मृत स्थिती आहे) इथे त्यांची दृष्टी सांगते आहे, की ही उषा संजीवनी तुल्य चैतन्य जागृती मानवी बुद्धीला देते आहे. '' ह्याच अचतेनेच्या अफाट समुद्रात, 'अंधकारात' **'पुरुषोत्तमाच्या'** मदतीने **'आद्यपुरुष'** जन्माला येतो. **'मानवाच्या मर्यादित जगतात'** मात्र अज्ञानरूपी 'साधी रात्र राज्य करते.' व ती 'पृथ्वी, मध्यजगत् व स्वर्ग,' म्हणजेच मन, शरीर, प्राणिमात्र जगताना व्यापून रहाते. उषा - स्वर्गाची 'दुहिता आपल्या सर्व प्रकाशासह व आपल्या सर्व वरदानासह विलसते. ती अज्ञानरूपी झल्यास पडद्यास बाजूस सारते व आपल्या प्रकाशमान अंगप्रत्यंगासह प्रकट होते व सूर्यास वरवरच्या जगताप्रत चढून जाण्यास मदत करते.''

अरविंदाच्या ह्या 'आध्यात्मिक अर्थ' प्राप्त करण्याच्या प्रयत्नांच्या पुराव्यादाखल ते ह्या २० ऋचांच्या 'उषासूक्त' ह्या ऋग्वेदी दैवी प्रतिभा पद्धतीचा अर्थाचा मागोवा कसा घेतात ते पाहू या!

पंडित चित्रावशास्त्री 'उषेचे पालूपद सूक्त' कोणते ते सांगतात.

पालुपदसूक्त - 'उषा अजीगर्भुवनानि विश्वा' हे ४ ते ६ ऋचांमध्ये आढळते.

---

'माणसाचे विचार हे त्याची व्यक्ती म्हणून जडणघडण करत असतात. त्यामुळे ज्या पद्धतीने तो विचार करेल, तशीच ती व्यक्ती घडते.' - महात्मा गांधी



पं चित्रावशास्त्री

त्याचा मराठी अर्थ - ''उषेने समस्त जगतास 'जागृत' केले आहे.'' हे 'जगत्' कोणते? ही जागृती कोणती? हे प्रश्न अनुत्तरित आहेत - आजपर्यंत!!

माझ्या अल्प मतीनुसार - नंतरचे ११ वे सुक्त स्वयंप्रकाशी आहे. ''उपुष्टे वे पूर्वतरत्मपश्यन् व्यच्छन्तोमुषसं मर्त्यासः।

अस्मतमिस नु प्रतिचक्ष्यामुदो ले यान्ति ये अपरीष्यु पश्यात् ॥११॥

ह्याचा पं. श्री एम शर्मा (गायत्री परिवार हरिद्वार) आचार्य ह्यांचा अर्थ पहा

'' जिन्होने पुरानी उषाओं को खिलते हुए देखा, वे मरकर चले गये। इस हम देखते है और आगे आनेवाली उषाओंको वे देखेंगे जो आयेंगे ॥११॥

पुढे हे उषे! सत्य को पराजित करनेवाली, नियमों मे अटल सुजियों की प्रेरक देवताओंके लिए हवि धारक सर्वश्रेष्ठ तू आज यहाँ प्रकट है ॥१२॥

प्राचीन काल में 'धन' युक्त उषा प्रकट होती थी। आज उषा से संसार को प्रकाशित किया है। भविष्यमे भी तु खिलेगी अजर, अमर यह उषा अपनी इच्छासे गतिमान है ॥१३॥

उषा अपने तेजसे आकाश मे चमक उठी। उसने काले अंधकार को दूर कर दिया। जीकों को चैतन्य करती हुई वह **'अरुण अश्वो'** वाले रथमे बैठ कर जाती है ॥१४॥

पालक तथा वरणीय धनोको दिलानेवाली यह उषा ज्ञान के उज्वल प्रकाश को भरती हुई विगत उषाओं से भी अत्यंत महत्त्व वाली है ॥१५॥

आता महायोगी अरविंद काही ऋचांचा लक्षवेधी अर्थ करतात तो प्रयत्न पाहू या.

१) ''सर्व जगताच्यासमोर उभी राहूनही, ती सर्वांचे वर अमरत्वाचा साक्षात्कार म्हणून वास करते (३.६१.३). ती स्वतःच तो नेत्र असते व तिच्या प्रियकर सूर्याप्रमाणेच ती साक्षात्कारच नव्हे तर शब्द (ज्ञानही, देते. ती सर्वांकरिता भाषा शोधून काढते''

**''आरम्यातील विचारांना'** प्रदर्शित करण्याकरिता माध्यम शोधून काढते, ज्यांना फक्त थोडेसेच दिसले आहे, त्यांना अनंत साक्षात्कार देते व सर्व जगतांची जाणीव व ज्ञान त्यांना करून देते. कारण, ती विचारांची देवता आहे. '' ती अनेक विचारांची तरुण व जुनी देवता असून ती दैवी नियमांप्रमाणे हालचाल करते'' (३-६१.१)

अवलोकन ज्ञानाची ती देवता असून तिजजवळ पूर्णसत्य आहे. ती सर्वोच्च प्रकाश असून चेतनेच्या साक्षात्कारात तिचा जन्म होतो. अंधकारातून वर येणारी पूर्वज्ञानरूपी ती आहे. ऋषी म्हणतात,

'' आम्ही आता अंधःकाराच्या पलीकडील काठास लागलो आहोत. उषेचे आगमन होत आहे. ती ज्ञानाच्या आकृत्या व जन्म यांना उत्पन्न करते. (९-९२.६)

या उषेच्या पलीकडील प्रकाशात जाणे म्हणजे मित्र व वरूण यांच्या अगाध ज्ञानाप्रत जाणे असून, तेथे ती उषा अनेक प्रकारच्या आकृत्यांत प्रकाश भरते. (३. ६१.७)

म्हणून ऋषी म्हणतात. ''उठा, जीवन व शक्ती तुम्हांप्रत आली आहे. अंधकार नाहीसा झाला आहे, प्रकाश उगवला आहे. तिने (उषेने)सूर्याकडे जाण्याकरिता

पथ मोकळा केला आहे. जेथे देव आपणास या मर्यादांचे पलीकडे घेऊन जातात त्या ठिकाणी आपण जाऊ या (१.२२३.१६)

" उदीर्ध्व जीवो असून आगादच प्रागात्तम या ज्योतिरोति।
आरैक पन्या याजवे सूर्यायगन्म यत्र प्रतिरत्न आयु ।।१६।।

डॉ. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव अर्थ लावतात. "गोसंपन्न आणि सर्ववीर युक्त उषा हवियुक्त सोमयाग करणाऱ्या मर्त्य उपासकांसाठी प्रकाशमान होतात. वाघगर्जनेप्रमाणे भासमान होणाऱ्या आमच्या स्तोत्र गर्जनांनी त्या आम्हापर प्रसन्न होवोत. (१.११३.१८)

**शब्द, अक्षर भाषा सत्य अर्थ :**

हे उतारे व परिच्छेद प्रथम दिले त्यावरून पूर्ण बोध होणे कठीण असेल, कारण, ह्यातील संकल्पना, शब्द, उपमा ह्या भाषेच्या अनेक युक्त्या, अलंकार, प्रतिके, प्रतिमा यांच्या वेदकालीन काळापासून अनेक युगे दूर आहोत. तेव्हा ह्यांतील कांही कठीण शब्दांचा विचार प्रथम करू.

**प्राकृतिक गूढ अर्थ व्यवहार :**

खुद 'उषा' ही साधी पृथ्वीवरील पहाट नसून आत्मा soul किंवा Consciousnes मध्ये क्रांतिकारी उच्च पातळीवर उदय होणाऱ्या स्थित्यंतराची 'पहाट' आहे. ही पहाट साध्या जड बुद्धीने घडून येणारी नव्हे. दैवी घटना आहे. प्राणी जीवन स्तरावर जन्मलेल्या मानवी आकृती आकार स्वरुपाला उच्च पातळीवरील ज्ञानाची भेट देणारी 'उषा' आहे. इजिप्शियन वाळवंटात spyux चा पुतळा आहे. तो अर्ध प्राणी अर्ध मानव स्वरुपाचा आहे. ह्याचा अर्थ प्राणी जीवनांतून निर्माण. उद्धार होणारा मानवी फॉर्म व स्तर आहे. त्याकडे ऑप्पूनस्की opunsky नावाच्या शास्त्रज्ञाना त्या भव्य पुतळ्याची दृष्टी कोठे स्थिरावली आहे ह्याचा प्रश्न पडला. त्याचे उत्तर त्याला जाणवले. अनुभूत झाले ते उत्तर होते Eternity 'अनंत' ह्याचा आपल्यापुरता अर्थ हाच की मानवाला जीवनचैतन्याचा Consciousnes चा उच्च प्रवासाचा दिव्यत्वाचा मार्ग 'Evolutionary Path' हा अनंततत्वावर आधारलेला आहे.

भगवद्गीतेतील 'पुरुषोत्तम योग' ह्यांतही 'बुद्धियोग' अतंभूत आहे. बुद्धीची सुद्धा जड वृत्ती आहे ती बदलून साक्षात्कारी ज्ञानाचा अर्थ लावणारी होणे, ही एक जैविक क्रांती आहे. त्यामुळे, भौतिक व मर्त्य देहाच्या जड इंद्रियाच्या मदतीने जे ज्ञान माणूस पृथ्वीवर प्रकृतीच्या परिसरांत मिळवतो. त्याचा स्तर भौतिक पातळीवरून जड - मानसिक - आत्मिक जाती स्तरावर भाषांतर होणे आवश्यक आहे. पृथ्वीही प्राथमिक शाळा आहे तर विश्व हे गूढ, अगम्य व अव्यक्त स्वरूपात - बीज स्वरूपांत जाणणे सत्य ज्ञानासाठी Real Knowledge मिळवण्यासाठी आवश्यक आहे. हे ही 'उषा' देऊ करते - ज्ञानार्थी विद्यार्थी मानवाने ते स्वीकारण्याची, ग्रहण करण्याची व बोध प्राप्त करण्याची साधना व तपस्या करणे आवश्यक आहे.

चित्राव शास्त्री ह्या उषा सूक्तातील 'पालुपदाचा' उल्लेख हेतूपूर्वक का करताहेत?

'उषेने समस्त जगतास 'जागृत' केले आहे' इथे जागृत यांचा अर्थ 'झोपेतून उठवले' एव्हढाच लहान नसून 'अज्ञानांध:कारातून' 'सत्य, दिव्य ज्ञानात' जाग येणे हा आहे. हे जागणे केवळ दैहिक अवस्थेतील नसून, मानसिक जागृतीच्याही वर आध्यात्मिक जागृतीच्या स्तरावरचे आहे.

ही 'जगते ही' अनंत आहेत स्वामी रामदासांच्या अनेक भुवने व ब्रह्मांडांचा निर्देश करणारी आहेत.

ही उषा पूर्वीच्या पुराणकालांतील युगायुगांच्या कालातून रोज उदय होत आहे. तिच्या ह्या सतत वाढव्य प्रयत्नांची सांखळी ह्या कॉशसनेसच्या दिव्यत्वीकरण्यामाठी घडत आहे. अशीच ती पुढेही भविष्यात युगानयुगे चालणार आहे आणि Crucible मध्ये या यज्ञकुंड कुपीमध्ये Con-

---

मनुष्याला साधन म्हणून वापरणे हे मानवी प्रतिष्ठेच्याच विरोधात आहे. - इमॅन्युअेल कांट, तत्वज्ञ

sciousness आहे. मग तिच्या या रथाला 'अरुण अश्व' कोणते?



श्री संत समर्थ रामदास

'अश्व' चा अर्थ 'भौतिक विश्वातला 'घोडा नव्हे तर त्याचा बीजात्मक स्वरुपातला अव्यक्त जगातला फॉर्म म्हणजे '' हा आध्यात्मिक शक्तीची, तपस्येची व शक्तीची प्रतिमा आहे'' अरविंदाचे हे स्पष्टीकरण पहा -

''ज्या वेळी ऋषी आनीस प्रार्थना करून ''अश्वाच्या आकाराची 'गाय' समोर असलेली देणगी मागतात त्यावेळी पुष्कळ 'घोडे' व त्यात पुढे चालणाऱ्या काही 'गाई' यांची मागणी करीत नसतात, तर जे तेजाने मार्गदर्शन केलेली महान आध्यात्मिक शक्ती मागत असतात'' (पान नं. १० 'वेद रहस्य' भाग पहिला श्री अरविंद आश्रम, पॉंडिचेरी)

ह्या उत्र्चाची खरी अडचण कोणती? तर, मानवाला या शक्तीयुक्त स्पंदातून आध्यात्मिक अर्थचे वहन व बोधामृत देण्याची कारण, यांतील विद्यार्थी हा मानवी - जीवात्मा आहे. त्याची बुद्धीची साधने सामान्य व जड आहेत. त्यांची 'लौकिक भाषा' (संस्कृतसुद्धा) कांही कामाची नाही. त्यामुळे 'आत्म्याच्या विचारांना योग्य भाषेची निवड आवश्यक ठरते.

योगायोग असा कीं हा लेख ह्या टप्प्यावर लिहीत असतानाच 'The Speaking Tree' ह्या Times of India च्या २९.३.२०१२ च्या अंकात पान १६ वर The Language of faith' हा लेख Krisha Kops ह्यांचा वाचण्यात आला. जिज्ञासूंनी हा लेख मुळातून वाचावा.

ते म्हणतात, बायबल, कुराण, वेद आणि इतर सर्व ग्रंथ आपल्या खोल हृदयात कोरून ठेवलेले आहेत. अश्रद्ध वा मास्तिकाने त्या दैवी शब्दांचा (श्रुती, वचने, आदेश) त्या ही अनादर वा अपमान करून केली तर त्याची सुद्धा हत्या केली जाते.''

पण, हा ईश्वरी शब्द (The word of God) त्याची हत्या का करावी - कारण त्या शब्द (अक्षर, लिखाण) ला प्रत्यक्ष ईश्वरी ज्ञानाचे स्थान वा प्रमाण कधीच प्राप्त नव्हते किंवा होणार नाही.''

कारण भाषा ही Subjective व्यक्तिनिष्ठ (वस्तुनिष्ठ नव्हे Not Objective) सत्य स्वरुपाची असते व तेही मर्त्य माणसाच्या स्तर संबधाने आणि - वाचाच अर्थ सत्यापासून दुरावलेली; त्यामुळे त्या गूढ परम सत्याची गहनता डिली-साधी केल्याखेरीज त्या नश्वर मानवाला अर्थाचा बोध होणे अशक्य असते''

त्या पुढचे म्हणजे महत्वाचे आहे. "Scholars Such as Norman Fairclough and Noam chomsky हे या मताचे आहेत कीं भाषा ही एका सतत संघर्षाचा विषय असते. ती सत्तारूढ पक्षाच्या बलशक्तिची गुलाम होते व त्यांना गर्भित हवी असलेल्या अर्थाक्त अंमल त्या राजसत्तेच्या वा धर्मसत्तेच्या गरजा सांभाळणारी अर्थप्रवण होते.'' आपल्याला हा प्रकार नवा नाही. वेदांचे कर्मकांडी अर्थच वेदांच्या संहितांना लावण्यात येत होते. सायनाचार्य हे त्या अर्थप्रकाराचे भाष्यकार व 'ब्राह्मणे'ज्या पद्धतीने यज्ञ व वेदार्थ प्रत्यक्षात व्यक्त करत होते, त्यातील अपप्रवृत्ती, अधिकाराचे विकृत अर्थ व प्रत्यक्ष 'मानव, प्राणी' यांची हत्या, धर्मसत्तेच्या आधारावर होत होती. त्याचीच

प्रतिक्रिया गौतम बुद्धाच्या विरोधी धर्मस्थापनेत झाली.

अगदी अलीकडेही, पैठणच्या धर्ममार्तंड ब्राह्मणांनी ज्ञानेश्वर प्रकृति चतुष्ट्याला, वेदांचे अधिकार नाकारले व शेवटी ज्ञानेश्वरांनी 'रेड्याच्या मुखातून वेद म्हणावयाला लावले.''



श्री संत ज्ञानेश्वर महाराज

ह्याचा आपल्या विषयाशी संबध असा कीं ''अपौरुषेय'' वेद संहितेंचे अर्थ - खरे अध्यात्मिक अर्थ लावण्याचे प्रयत्न ह्या नजीकच्या काळात 'स्वामी दयानंद' (आर्य समाज) व त्यानंतर महायोगी अरविंद 'वेद रहस्य' ह्या ग्रंथापासून सुरुवात झाली. त्यापुढे कपिलशास्त्रीयत् आजही संपूर्ण वेदांचे खरे अध्यात्मिक अर्थ लावण्यात आलेले नाही. त्यामुळे वेदिक संस्कृति, साधना व विश्वरहस्य असंशोधित व अपूर्ण वा निकृतही ज्ञानाच्या स्तरावर आहे.

''उषासूत्ताचा'' गौरवपूर्ण उल्लेख जो महायोगी अरविंद आपल्या 'The Life Divide' ह्या श्रेष्ठ पुस्तकात प्रारंभीच करतात, त्याचे कारण लक्षात यावे.

हा प्रयत्न केवळ एका सूक्तापुरता मर्यादित नव्हे तर वेदिक समग्र वाङमयाला ह्या पद्धतीने छानून सुशोधित करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. भौतिक विज्ञान व भौतिक मानवी निर्मीत शास्त्रे ह्यांना हे विश्वरहस्य, जीवन रहस्य व त्यांतील ''दिशा व ध्येये व सत्य'' कधीच पूर्णपणे ज्ञान होणार नाहीत, जो पर्यंत ही संहिता रहस्ये उकलण्यासाठी लागणारी 'ऋतंभरा प्रज्ञा' माणसाला प्राप्त होणार नाही.

ह्या साधनातंत्राच्या मिळकतीकरितां 'उषासूक्तांचा अर्थ लावण्याची पद्धती माहिती व्हावी हा या लेखाचा उद्देश आहे. एव्हढेंच नव्हे तर मानवी प्रयत्नांना या 'ऋतंभरा प्रज्ञेच्या' प्राप्ति करता जी उत्क्रांति तत्वावर आधारलेली Consciousness चैतन्य बुद्धी शक्तीची वाटचाल करावी लागणार आहे, त्याचा परिचय व्हावा.

ह्या दिव्य चालीवर प्रगती करण्यासाठी ही 'उषा' दररोज आकाशांत नियमितपणे उदयाला येते आहे - येणार आहे. तिच्या आगमनाचा अर्थ व मदत घेण्याची क्षमता आपल्याला वाढवावयाची आहे. ही जाणीव होणे अगत्याचे आहे. हे मला ठसवावयाचे आहे.

प्रयत्न, इथे एका सूक्तापुरता मर्यादित रहाणार नाही हे उघडच आहे. हा प्रयत्न समाष्टि तर्फे, राजसत्तेतर्फे शिक्षण संस्थातर्फे, गुरूकुलांमार्फत सर्वत्र सातत्याने व पिढ्यानिपिढ्या होणे आवश्यक आहे.

हा आहे अनंताचा प्रवास!! हा आहे ''अनंताचा सुवर्ण पुत्र मानवाचा खरा अजेंडा''

ह्याला संबंधित ह्या विषयाच्या पाठपुरावा दिशा व इतर मार्गाने चालू ठेवण्याचा माझा इरादा आहे.

ईश्वरी आशीर्वादाची अपेक्षा आहे.

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

# मोरेश्वर दिनकर पराडकर

*संस्कृत व एकूणच साहित्याचा गाढा व्यासंग असणाऱ्या पराडकरांवरील हा लेख*

मोरेश्वर दिनकर पराडकर यांचा जन्म मराठीतील ख्यातनाम पंतकवी कविवर्य मोरोपंत यांच्या सातव्या पिढीमध्ये झाला. भाषा आणि पांडित्य यांचा वारसा त्यांच्याकडे अशा प्रकारे वंशपरंपरागतरीत्या आला.

प्रकांडपंडित हे विशेषण ज्यांच्या नावामागे चपखलपणे बसू शकेल, त्या मोरेश्वर दिनकर पराडकर यांचे भाषाभिवृद्धीतील योगदान मोठे तर आहेच; पण मूलभूत स्वरूपाचेही आहे. संस्कृतभाषा आणि साहित्य यांचे गाढे अभ्यासक, हिंदी भाषेचे प्रचारक, इंग्रजी आणि मराठी भाषांवर प्रभुत्त्व ही मोरेश्वर दिनकर तथा मो. दि. पराडकर यांची विशेष ओळख आहे. भाषा विकासाच्या क्षेत्रात आवाक्याने मोठे आणि मूलभूत स्वरूपाचे संशोधन, लेखन करणारे अभ्यासक आज हाताच्या बोटावर मोजावेत इतकेच असतील. डॉ. मो. दि. पराडकर दुर्मीळ आणि विद्वान अभ्यासकांपैकी एक आहेत.

**जन्म व बालपण :**

यांचा जन्म मराठवाड्यामधील परभणीत झाला. दि. १७ नोव्हेंबर १९२५ ही त्यांची जन्मतारीख, परभणी गाव हे आज जिल्ह्याचे ठिकाण आहे. पण स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये हा प्रदेश हैद्राबादच्या निजामाच्या अख्यत्यारीत होता. या परभणीतील त्यांच्या आजोळी, म्हणजे श्री. गोविंदराव नानल यांच्या घरी डॉ. मो. दि. पराडकरांचा जन्म झाला. श्री. गोविंदराव नानल हे त्याकाळामधले प्रसिद्ध वकील म्हणून सर्वज्ञात होते, वकीलीबरोबरच त्यांचे संस्कृत, उर्दू, मराठी, पर्शियन या भाषा व या भाषांतील साहित्यावर विशेष प्रेम होते. या प्रेमातूनच त्यांच्या घरी या भाषा आणि साहित्य यांचे समृद्ध ग्रंथालय निर्माण झाले होते. अगदी लहान वयातही घराच्या वातावरणातील परिणाम होतो; तसा तो डॉ. मो. दि. पराडकर यांच्यावरही झाला. आजोबांच्या प्रेरणेतूनच केवळ पाच वर्षांचे असताना त्यांनी शारदोत्सवातील स्पर्धेत भाग घेऊन गीतेचा पंधरावा अध्याय म्हटला. या स्पर्धेत त्यांना कांस्य पदक मिळाले. गोविंदरावांच्या प्रोत्साहनातून व प्रेरणेतून त्यांच्या सहवासात डॉ. मो. दि. पराडकर यांच्या मनात या अभ्यासाची ओढ निर्माण होत गेली. कुटुंबात सर्वांत लहान असल्याने ते सर्वच कुटुंबीयांचे अतिशय लाडके होते. त्यांचे काका श्री. भास्करराव रघुनाथ पराडकर यांचाही त्यांच्यावर विशेष जीव होता. असे असले तरी, घरातील शिस्तदेखील तितकीच करडी होती. निजामशाहीच्या त्या दिवसातील शालेय जीवनात शिक्षणाचे माध्यम उर्दू हे होते. डॉ. पराडकर यांच्या उच्चारशैलीवर उर्दूचा परिणाम आजही जाणवतो. उर्दूच्या या प्रभावातूनच जीवनात पुढील वाटचालीतील हिंदी भाषा प्रचारक म्हणून काम करण्याची बीजे रोवली गेली.

काही वर्षे परभरणीला राहिल्यानंतर आपल्या वडीलांबरोबर डॉ. पराडकर मुंबईला आले. त्यांचे वडील दिनकरराव पराडकर हे मध्यवर्ती पोस्ट कार्यालयात होते. बालवयातच साहित्य आणि संस्कृतीच्या आस्थेचे रंग मनात निर्माण झाले होते. सुदैवाने परळच्या आर. एम. भट या हायस्कूलमध्ये वडीलांनी त्यांना दाखल केले. आर. एम. भट या शाळेचे नाव तेव्हाच्या शालेय शिक्षण जगतात बरेच वरचे होते. त्या शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक कै. मो. वा. दोंदे यांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा आणि शाळेतील संस्कृत शिकवणाऱ्या कै. वाय. बी. जोशी यांच्या व्यासंगी

अध्यापनाचा खोलवर संस्कार पराडकरांवर झाला. मो. वा. दोंदे हे पुढे नगराध्यक्ष झाले. डॉ. पराडकर हे त्यांचे अतिशय आवडीचे विद्यार्थी होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच डॉ. पराडकर ६७% मार्क मिळवून मॅट्रिकला पहिले आले. त्याबद्दल त्यांना शिष्यवृत्तीही मिळाली.



मोरेश्वर दिनकर पराडकर

शालेय शिक्षणाचा हा टप्पा पार केल्यानंतर महाविद्यालयाची निवड हा साहजिकच पुढचा टप्पा असतो. शिष्यवृत्ती मिळाली असल्याने आणि उत्तम गुण मिळालेले असल्याने डॉ. पराडकर यांना माटुंग्याच्या राम नारायण रुइया कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. राम नारायण रुइया कॉलेज हे त्यांतील विद्वान प्राध्यापकांमुळे त्या काळात सर्वोत्तम महाविद्यालय होते. काही कौटुंबिक अडवणींमुळे डॉ. पराडकर यांना नोकरी करून शिकणे भाग पडले. पण या महाविद्यालयीन कालखंडातही त्यांचे संस्कृत साहित्यातील व भाषेतील स्वास्य टिकून होते. पदवीसाठी मुख्य विषय कोणता निवडायचा असा प्रश्न समोर आला तेव्हा स्वाभाविकच संस्कृत विषय निवडण्याचे त्यांनी निश्चित केले. त्याकाळी संस्कृत निवडणाऱ्या विद्यार्थ्याला विशेष मान होता आणि बालवयापासून त्यांच्यावर संस्कृतचे संस्कारही झाले होते. रुइया महाविद्यालयात डॉ. पराडकर यांना कै. न. र. फाटक, कै. द. के. केळकर कै. गोवर्धन पारिख अशा अत्यंत नाणावलेल्या प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि सहवास मिळाला. संस्कृत हा प्रमुख विषय घेऊन डॉ. पराडकर यांनी बी. ए. ची परीक्षा दिली. ते भाऊ दाजी पारितोषिकाचे आणि एस. जी आचार्य शिष्यवृत्तीचे मानकरी ठरले. याचा एक लाभ असा झाला की, संस्कृत विषय घेऊनच एम. ए. करण्याची त्यांना संधी मिळाली. एम. ए. च्या परीक्षेतही त्यांनी प्रथम वर्ग मिळवला. प्रथम वर्गाबरोबरच त्यांना त्यांच्याच महाविद्यालयात म्हणजे रुइयामध्ये शिकवायची संधी मिळाली. प्रा. न. र. फाटक, द. के केळकर इत्यादी उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या प्राध्यापक मंडळींचा आपल्याला सहवास लाभला, या बद्दल ते स्वत:ला अतिशय भाग्यवान समजतात.

आपल्याला चांगले शिक्षक मिळाले तसेच सुदैवाने विद्यार्थीही चांगले मिळाले अशी त्यांची भावना आहे. अध्यापन आणि चिंतन यांत आपण गतिशील राहिलो नाही, तर विद्यार्थ्यांच्या अपेक्षांचा भंग होईल हा विचार त्यांच्या मनात होता त्यामुळे आपल्या चिंतनाला त्यांनी लेखनाची जोड दिली. आज त्यांच्या नावावर जमा असणारे साहित्य हे त्यावेळच्या संशोधनाच्या ओढीच्या काळापासून लिहिले गेले आहे.

आपली संस्कृती आणि संस्कृत भाषा यांच्याबद्दल आपल्याकडे अनेक गैरसमज आहेत असे त्यांच्या लक्षात आले. ऐहिक अभ्युदयासाठी झटण्याऐवजी जीवनाकडे वैराग्याने आणि तुच्छतेने आम्ही पहातो, परलोकाबद्दल विचार करतो यांचा परिणाम ज्ञानशाखा आणि विज्ञान यांच्याकडे दुर्लक्ष होण्यामध्ये झालेला दिसून येतो. हे दूर करणे आणि भारतीयांच्या जीवन दृष्टी संबंधाने योग्य त्या अभिमानास प्रोत्साहन देण्याची गरज आहे, याची खात्री पटल्यामुळे डॉ. पराडकर यांनी गेली सुमारे सहा दशके अनेक लेख लिहिले.

प्रा. एच. डी. वेलणकर या संस्कृतमधील ख्यातनाम अभ्यासकाच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी मुंबई विद्यापीठाची

विद्यावाचस्पती ही पदवी १९५४ मध्ये प्राप्त केली. त्यांच्या संशोधनाचा विषय, व्यावसायिक जीवनाचा कालखंड, आपल्या अध्यापकीय कारकीर्दीत संस्कृत व अर्धमागधी या भाषांचे त्यांनी अनेक महाविलयांतून अध्यापन केले. संस्कृत भाषेचे ख्यातनाम शिक्षक म्हणून मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभागास त्यांनी मोलाचे योगदान दिले. विद्यावाचस्पतींच्या अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. वेदांत व अलंकार या विषयातील त्यांचे संशोधन महत्त्वाचे मानण्यात येते.

पालघर येथे सोनोपंत दांडेकर यांच्या नावे नव्यानेच महाविद्यालय सुरु झाले होते. या महाविद्यालयात डॉ. पराडकर यांनी प्राचार्य पदाची सूत्रे हाती घेतली. त्यानंतर काही वर्षे डोंबिवली येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून त्यांनी काम पाहिले. १९८५ साली ते निवृत्त झाले.

१९४२ साली राष्ट्रभाषा कोविद या परीक्षेत सर्वप्रथम आल्यापासून त्यांनी हिंदी राष्ट्रभाषा प्रचारक म्हणून आपले काम एकीकडे चालू ठेवले होते. अर्थातच याचे महत्त्वाचे कारण म्हणजे हिंदी भाषा व साहित्यात त्यांना विलक्षण रस होता. १९५१ साली ते हिंदी साहित्यरत्न ही अत्यंत मानाची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यामुळे मुंबई हिंदी विद्यापीठाचे अधिकारी आणि अखिल भारतीय हिंदी संस्थेचे कार्यवाह म्हणून त्यांच्या कर्तृत्वास वाव मिळाला. हिंदी साहित्यातील अनेक नामवंत विद्वान संशोधक कवी, यांचा पराडकरांशी संबंध आला.

१९८४ साली त्यांच्याकडे असणाऱ्या कविवर्य मोरोपंत यांच्या हस्तलिखितांचा निर्णय घेण्याची वेळ आली. त्यावेळी त्यांच्या काकांनी ही हस्तलिखिते देणगी दाखल चांगल्या ग्रंथालयाला द्यावीत, असे सुचवले. याच दरम्यात डॉ. उषा देशमुख आणि मा. ना. आचार्य या मराठीतील विद्वान मंडळीशी त्यांचा संबंध आला. या हस्तलिखितांचे महत्व या विषयावर त्यांनी विवेचक लेख लिहिला. संस्कृत मधील डॉ. टी. एन. धर्माधिकारी, डॉ. जी. बी. पळसुले, डॉ. बी. एम. कुलकर्णी अशा अनेकांशी अनेक वर्षांचे संबंध आहेत. डॉ. पराडकर यांचे प्रकाशित झालेले साहित्य हा स्वतंत्र निबंधाचा विषय ठरेल. त्यांचे लेख, शोध निबंध यांची बरीच मोठी यादी त्यांच्या नावावर जमा आहे. जागे अभावी फक्त ग्रंथांची नावे देत आहे.

**डॉ. मो. दि. पराडकर यांची प्रसिद्ध झालेली ग्रंथसंपदा**

**इंग्रजी**

Similies in Manusmriti

Malavikagnimitram - A Criticl study

Ed. Studies in the Geeta

**मराठी**

शाकुन्तल (कथा), मालविकाग्निमिग (कथा) (१९७८)

भारतातील प्राचीन विद्यापीठे - दुसरी आवृत्ती (१९९०)

संपादित - आर्याभारत ६ खण्ड, हरिवंश वगैरे (१९६४)

मयुराख्यान (१९८०), वाडेश्वर माहात्म्य (१९८१)

हिन्दी अनुवादित ग्रंथ

वैदिक संस्कृतिका विकास (१९५७)

रवीन्द्रनाथ जीवनगाथा (१९६५)

ऋक्सूक्तवैजयंती (१९६७)

विवेकानन्दांची पत्रे (१९७०)

**संपादि**

रजत जयंती ग्रंथ (१९६३)

हिन्दी भाषा साहित्य और संस्कृती (१९८८)

स्तबक व डॉ. मो. दि. पराडकर अभिनन्दन ग्रन्थ.

**- श्री. मोहन पाठक, ठाणे**

दूरध्वनी क्र. : ०२२-२५४२६२७०

●●●

# ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी दत्ताजी ताम्हणे

*ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी दत्ताजी ताम्हणे यांनी १३ एप्रिल रोजी वयाची १०० वर्षे पूर्ण केली. त्यांचा परिचय करुन देणारा हा लेख दैनिक सन्मित्राचे श्री. विजय जोशी यांच्या सौजन्याने येथे देत आहोत - संपादक*

आजचा तरुण अजिबात बहकलेला नाही. अनेकजण गाजावाजा न करता विधायक काम करीत आहेत. चारशे बाटल्या रक्त जमविणाऱ्या तरुणांना खरी गरज आहे त्यांची पाठ थोपटण्याची, त्यांना व्यवस्थित मार्गदर्शन मिळाल्यास देश कुठल्या कुठे जाईल. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर अशा दोन्ही कालखंडाचे साक्षीदार असलेले ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी आणि थोर विचारवंत दत्ताजी ताम्हणे यांनी १०० व्या वर्षामध्ये पदार्पण करण्याचा योग साधताना आजच्या तरुणाई बद्दलची आपली ओंजळ रिती केली. सदर ओंजळीवरुन या वयातही ते जीवनाकडे किती सकारात्मक दृष्टिकोनातून बघतात याची प्रचिती येते.



१३ एप्रिल १९१३ रोजी रत्नागिरी येथे जन्मलेले दत्ताजी १३ एप्रिल २०१२ रोजी आपल्या वयाची ९९ वर्षे पूर्ण करून १०० व्या शुभ वर्षात पदार्पण करीत आहेत. वयोपरत्वे कान व डोळे यांचे कार्य थोडे शिथिल झाले असले तरी सदर कर्मयोग्याचं कार्यचैतन्य अगदी जागं आणि रसरशीत आहे. खणखणीत आवाज, लिहिता हात, दुडुदुडु चाल, तल्लख स्मरणशक्ती, शाबूत विनोदबुद्धी, कार्यक्रमात तीन-चार तास ताटकळत बसण्याचा स्टॅमिना, गतकाळातल्या आठवणी आणि घटना या साऱ्या गोष्टी कार्यशील या नात्यानं शंभर नंबरी आहेत.

लौकिक अर्थाने दत्ताजी राजकीय नेते. पूर्वी काँग्रेस आणि १९४७ पासून पुढे समाजवादी पक्षाचा आश्रय. त्या पक्षात पुढे अनेक उलथापालथी झाल्या. पण लोकशाही समाजवादावर अतूट निष्ठा असलेल्या दत्ताजींच्या मनाला असलेल्या दत्ताजींच्या मनाला विठ्ठला कोणता झेंडा घेऊ हाती हा विचार कधी शिवला देखील नाही. सर्वसमावेशक वृत्ती ही त्यांची खरी ओळख. त्यामुळे संघ-जनसंघ-भाजपापासून मार्क्सवादी कम्युनिस्टांपर्यंत सर्वांनाच ते 'आपला माणूस' वाटतात. मुल्याधिष्ठीत जीवन, अपार कार्यनिष्ठा आणि कमालीचा साधेपणा ही त्यांच्या जीवनाची त्रिसूत्री. स्वातंत्र्य आंदोलन, राजकारण, समाजकारण, विधीमंडळातील कर्तृत्व, साहित्यकाव्य शास्त्र-विनोद आणि कुटुंबवत्सल माणूस या सर्वांचीच त्यांची घट्ट दोस्ती. पक्षकार्यासाठी महाराष्ट्रभर त्यांचा संचार झाला असला तरी ठाणे जिल्हा हीच त्यांची खरी कर्मभूमी. १७६१ गावापैकी किमान १७०० गावे पायी फिरणारे दत्ताजी ताम्हणे हे एकमेव राजकीय नेते असावेत. विधायक व सर्वसमावेशक नेतृत्वाची ठाणे जिल्ह्याची सुस्पष्ट भाग्यरेषा म्हणजे दत्ताजी असे म्हणावे लागेल. त्यांचंच दुसरं नाव 'अजातशत्रू' होय.

विद्यार्थीदशेपासून म्हणजे वयाच्या १६ व्या वर्षापासून तब्बल १८ वर्षे झालेला स्वातंत्र्य आंदोलनाच्या सहभागाचा त्यांचा प्रवास मंतरलेला होता. शिवाय तो

प्रवास म्हणजे त्यांच्या राजकीय शिक्षणातील एक पर्वच ठरले. 'सायमन कमिशन गो बॅक' चा नारा, पदाधिकारी म्हणून काँग्रेसचे काम, महात्मा गांधीजींचे निकटवर्तीय, आनंद स्वामी यांच्या आश्रमात व्यतीत केलेले दिवस वैयक्तिक सत्याग्रहींच्या तुकड्या उभारण्याची उचललेली जबाबदारी, वाडा तालुक्यात १४७ पैकी ११७गावांत पायी फिरून घेतलेल्या सभा, अनेक ज्येष्ठ काँग्रेस व समाजवादी नेत्यांचे लाभलेले सान्निध्य आणि १९४२ च्या चलेजाव आंदोलनात २ वर्षे भोगावा लागलेला कारावास आदी अनेक घटनाक्रमांनी त्यांचा हा प्रवास भारलेला आहे.

राजकारण सर्वचजण करतात. पण दत्ताजी तत्त्वनिष्ठ राजकारण आयुष्यभर जगले. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसचा पूर्णवेळ कार्यकर्ता या नात्याने काम करतानाच एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, अच्युतराव पटवर्धन यांच्या कार्याचा प्रभाव त्यांच्यावर होता. पुढे ठाणे जिल्ह्यात राजकीय परिषदेमध्ये एका ठरावावर बोलताना समाजवादी मंडळींनी सूचविलेल्या काही सुधारणांना दत्ताजींनी पाठिंबा दिला. पण पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून त्यांना काँग्रेसकडून मानधन मिळत होते. नैतिकदृष्ट्या मानधन स्विकारण्यास बाणेदारपणे नकार देऊन ते काम करीत राहिले. मुख्यमंत्री बाळासाहेब खेर मंत्रीमंडळात राज्यमंत्रीपदाची देऊ केलेली जागा सरकारी नोकरीची असल्याच्या कारणास्तव त्यांनी नाकारली. मोरारजीभाईंशी त्यांची खूप जवळीक होती. त्यांनी गळ घालूनही सरकारात सहभागी होण्याची विनंती नम्रपणे दत्ताजींनी नाकारली होती.

भाववाढ विरोधी आंदोलन, जंगल कामगारांचा लढा, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी काढलेले मोर्चे, सत्याग्रह, धरणे, संमेलने, परिषदा आणि बैठका आदी अनेक कार्यक्रमांनी त्यांची राजकीय कारकीर्द भारलेली आहे. गोवा मुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि आणीबाणीच्या विरोधातील सत्याग्रह यामध्ये त्यांच्या नेतृत्वाचा कस लागला. आपल्या राजकीय जीवनात जवळजवळ ७ वर्षे त्यांना कारावास भोगावा लागला. तुरुंगवास घडला नसता तर राजकीय जीवनात अपरिपक्व राहिलो असतो अशी त्यांची भावना आहे. १९५७ मध्ये ते ठाण्यातून विधानसभेवर निवडून गेले. १९६८ मध्ये विधानसभेतून ते विधानपरिषदेवर आमदार पदी पोहोचले. ११ वर्षांची त्यांची संसदीय राजकारणाची कारकीर्द स्पृहणीय ठरली. वाचन, संसदीय आयुधांचा वापर, सखोल अभ्यास, मुद्देसूद भाषण, तारांकित व अतारांकित प्रश्न, लक्ष्यवेधी हक्कभंग प्रस्ताव, विशेष सूचना आदी अनेक मार्गांनी त्यांची ही कारकीर्द गाजली. विधीमंडळाच्या ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वापर करणाऱ्या मोजक्या आमदारांमध्ये दत्ताजींचा क्रमांक सर्वात वरचा होता. त्यांच्या या संसदीय अनुभवाचा पुढे अनेक आमदारांना फायदा झाला. सभापतीपासून ते मुख्यमंत्र्यापर्यंत सर्वजण त्यांच्या शब्दाला मान देत असत. राज्यात सेना-भाजपा युतीची सत्ता आल्यावर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी आमदारांच्या प्रशिक्षणासाठी दत्ताजींची नियुक्ती केली होती.

राजकारणातील तत्त्वनिष्ठ व ध्येयवादी माणसाचं जीवन अनेकदा कमालीचं रूक्ष व एकारलेलं असल्याचं आढळून येतं. दत्ताजी मात्र त्याला अपवाद आहेत. जीवनाच्या विविध क्षेत्रात त्यांना रस व रूची आहे. नाटक, साहित्य, सिनेमा, काव्य-शास्त्र-विनोद, वक्तृत्व, लेखन, वाचन, प्रवास, गाणी भेंड्या, गप्पागोष्टी, छायाचित्रण, सहल, स्वयंपाक, पक्वान्न, खेळ, औषधे, पशु-पक्षी, डोंगरवाटा, वृक्षराजी, फुलपाखरं, निसर्ग आदी अनेक विषयांचा त्यांना छंद आहे.

पुस्तके माणसाचं आयुष्य समृद्ध करतात. तुरुंगात अनेक पुस्तकाचं त्याचं वाचन झालं, साहित्य-काव्यशास्त्र-विनोद यांच्या साहचर्यानं त्याचं अवघं जीवन उजळून निघालं. जुनी नवी पुस्तके, मासिके, दिवाळी अंक,

चांगला दिवस आनंद देतात, वाईट दिवस खूप काही शिकवून जातो, या दोन्ही गोष्टी आयुष्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे दिवसाला नावे ठेवू नका.

साप्ताहिके, कॅसेटस् टेपरेकॉर्डर, टपालांनी आलेली पत्रे अशा सर्व वस्तूंची त्यांच्या अभ्यासिकेच्या खोलीत जत्राच भरलेली असते. मोरोपंत, वामन पंडित, केशवसुत, गडकरी, तांबे, माधव ज्युलियन अशा किती जणांच्या कविता दत्ताजींच्या तोंडपाठ आहेत. कवी मनाच्या दत्ताजींनी अनेक छंदोबद्ध विनोदी व विडंबन कविता पसरवल्या असून त्या प्रांतातली आपली मुशफिरी दाखवून दिली आहे. कारावासाच्या काळात झालेली पुस्तकांची मैत्री हा त्यांच्यासाठी आयुष्यभराचा ठेवा ठरला. अनेक पुस्तकांचे वाचन आणि पाऊण लाख पृष्ठांचे परिशीलन त्यांच्याकडून या बंदीकाळात झाले. चर्चा, वादविवाद, व्याख्याने, गाणी, बंगाली व उर्दू भाषेचे धडे, होमिओपॅथीचा परिचय, ब्रिज खेळातील बारकावे, टेनिस खेळाचे धडे, अभ्यासवर्ग, विविध स्पर्धा, कीर्तन, एकमेकांचे वाढदिवस आदी अनेक प्रकारच्या तुरुंगामधील उपक्रमांमधून दत्ताजींचे आयुष्य बहुश्रुत आणि बहुआयामी बनले.

दत्ताजींच्या आयुष्याच्या, लोकसंग्रहाचा, त्यांच्या माणूसकीचा आणि त्यांनी उभ्या केलेल्या प्रचंड आणि विधायक कार्याचा सर्वांनाच अभिमान वाटतो. त्यांचा स्नेह, त्यांचा आशीर्वाद आणि त्यांचा विश्वास आपल्याला मिळावा असं सगळ्यांना मनापासून वाटतं यातच दत्ताजींच्या व्यक्तीमत्वाचं मोठंपण दडलेलं आहे. जगणं आणि कर्तृत्वाच्या दृष्टीन शंभर नंबरी असलेले दत्ताजी आज वयाच्या दृष्टीनेही 'शतकयोगी' ठरले ही घटनाच विलक्षण प्रत्ययकारी आहे. आयुष्याचे १०० पावसाळे पाहिलेल्या या कर्मयोग्याचं आजच्या तरुणाईबद्दलचं मत प्रचंड आशावादी आणि विलक्षण सकारात्मक आहे. त्यांच्या आयुष्याच्या चौथ्या व पाचव्या पंचविशीच्या या आरोग्यपूर्ण प्रवासाला शंभर नंबरी शुभेच्छा.

श्री. श्रीकान्त नेर्लेकर
व्यास क्रिएशन, ठाणे

•••

पाचवी सहावीतल्या दहा वर्षांच्या ऐश्वर्याने थेट पंतप्रधान कार्यालयाशी संपर्क साधला व 'महात्मा गांधींना राष्ट्रपिता ठरवणारा सरकारी अध्यादेश आहे काय असा प्रश्न तिने उपस्थित केला. तिच्या या 'प्रश्नपत्रिकेचे' उत्तर देताना सरकारी खात्यांची तारांबळ उडाली. सर्व माध्यमांना बातमी पुरवणारा हा प्रश्न खरोखरच विचारात टाकणारा आहे. या नेत्याला 'हे विशेषण दिले कोणी?' या इतिहासाचा अभ्यास करून आपण 'दिशा' साठी नक्की लिहू शकता. या बरोबरच लोकमान्य, स्वातंत्र्यवीर, महात्मा या विषया संदर्भात विचार मंथन करणारे लेखनही आपण दिशासाठी पाठवावे. अर्थात फक्त संशोधन मूल्य असणे अपेक्षित आहे.

– संपादक

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.


---

स्वप्न आणि उद्दिष्ट यांत एकच फरक असतो; स्वप्ने येण्यासाठी झोपावे लागते आणि उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी झोप विसरून काम करावे लागते.

# आवाज कुणाचा?

*ध्वनिप्रदूषणावर कायदेशीर लक्ष देण्याचा डॉ. महेश बेडेकरांचा हा लेख - संपादक*

सर्वसामान्यपणे स्वातंत्र्योत्तर भारतात जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रगतीच्या नावाखाली अधोगती व विकासाच्या नावाखाली भकास करणारी अवस्था ही अनेक समस्यांमागील कारण ठरत आहे. नागरीकरणाचे अनियंत्रित केंद्रीकरण होऊन सूज आलेली शहरे, पूर्वी गाव या सदराखाली असणारी जिल्हा व तालुक्यांची ठिकाणे आणि नीरव शांतता असण्याची अपेक्षा असणारी खेडेगावेही अधोगतीचा नीचांक गाठताना दिसत आहेत. यात प्रदूषणाच्या सर्व प्रकारापैकी ध्वनिप्रदूषण ही समस्याही अंतर्भूत आहे. महाराष्ट्रात प्रसिद्ध असणाऱ्या गणेशोत्सव व शिवजयंती या ऐतिहासिक उत्सवांपासून ते सर्व धर्मातील सण, उत्सव, वैयक्तिक समारंभापर्यंत ज्या तीव्रतेच्या ध्वनीची निर्मिती होते ती पाहता,



भीती वाटावी असे वातावरण आहे. या सणांच्या संदर्भात लोकमान्य टिळकांची भलावण करणारा एक वर्ग आजही समाजामध्ये खूप मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. या वर्गातील तथाकथित परंपरावादी, इतिहासप्रेमी(!) लोकांनाही लोकमान्य टिळक जर आज असते, तर विकृतीकरण असणारे हे उत्सव अशा रीतीने साजरे करणे त्यांना चालले असते का? हा प्रश्न विचारला तर या लोकांचे उत्तर नकारात्मक आले असते. इतिहासातील नेतृत्वाचे आदर्श असणाऱ्या नेत्यांची नावे घ्यायची हा आपल्या विद्वतेचा एक मापदंड झाला. या विद्वतेचा दुसरा मापदंड म्हणजे पाश्चात्य देशांची उदाहरणे देणे. ध्वनिप्रदूषणाला आक्षेप घेणाऱ्या लोकांना या संबंधी आपण बोललो तर 'अमेरिकेत व इतर पाश्चात्य देशामध्ये याच्यापेक्षाही कर्कश संगीत असते. त्यांना नियम नाही का?' असे ते विचारतात. परंतु अत्यंत महत्त्वाचे फरक असे लोक नजरेआड करतात. त्यातील एक म्हणजे समाजातील इतरांना त्रास होईल अशारीतीने ते लोक असे उत्सव करीत नाहीत व दुसरे म्हणजे त्यांच्या लोकसंख्येची घनता यात असणारी मोठी फारकत. 'माझ्या धर्मामुळे, उत्सवामुळे, सणांमुळे समाजातील इतरांना त्रास होत नाही ना?' हा विचार करण्याचा संस्कार त्यांच्यावर आहे आणि त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक नेतृत्व, सण, उत्सव, समारंभ, मिरवणुका यांचा आपल्या स्वार्थासाठी साधन म्हणून वापर करत नाहीत.

ध्वनीची तीव्रता किती डेसिबल असावी? वातावरणात धूरकांचे प्रमाण किती असावे, वाहनांचा वेग कोणत्या रस्त्यावर किती असावा, अशा अनेक संदर्भामध्ये 'जागतिक आरोग्य संघटनेने' नियम घालून दिले आहेत. या क्षेत्रांतील शास्त्रज्ञ व त्यांचे संशोधन यावरून मान्य झालेल्या संकेतांचे हे नियम पाळले जातात. मग आपणच याबाबत विचार का करत नाही?

आपल्या घटनेने इतके कायदे केले आहेत, की ते अमलात आणले तर कितीतरी प्रश्न सुटतील, गेली पाच, दहा वर्षे अशा क्षेत्रामध्ये केल्या जाणाऱ्या व संघटित रूप

धारण करू पाहणाऱ्या काही चळवळींचा सकारात्माक परिणाम आता काही प्रमाणात दिसू लागला आहे. लोकशाहीत कायद्यासह ज्या यंत्रणांनी अशा बाबतीत कारवाई करणे अपेक्षित आहे. त्या यंत्रणाचा दिशाहीन बनत चालल्या आहेत. सामाजिक जाणीव हवी, शिक्षण हवे इत्यादी बाबी तर आहेतच; पण एकूण सामाजिक जीवनात सुद्धा चालू असणारी राजकीय टगेगिरी या नियमांमध्ये शिथिलपणा आणण्याचा प्रयत्न करते.

भाजल्यावर त्याचा परिणाम लगेच दिसतो, पण ध्वनिप्रदूषणाचा परिणाम दिसून यायला काळ जावा लागतो. धार्मिक मिरवणुकीमध्ये डी. जे. लावून जी कंपने निर्माण केली जातात. त्यांचा परिणाम परिदरातील सर्व सजीव आणि निर्जीव घटकांवरही होतो. कोणत्याही धर्मातील, कोणत्याही देवाने माझ्यासाठी डी. जे. लावा असे सांगितल्याचे ऐकिवात नाही. वास्तविक अशा मिरवणुकांच्या माध्यमांचा कीर्तन, पोवाडे, इ. सादर करण्यासाठी प्रबोधनपर दर्प, सामाजिक नेतृत्वाखाली भंपकपणा या बाबी 'आवाज कोणाचा?' याची स्पर्धा लावल्याप्रमाणे वर्तन करतात व त्यासाठी शाळा, महाविद्यालये, मंदिरे, इस्पितळे इ. शांतता क्षेत्रात आपले अस्तित्व दाखवण्याचा खटाटोप करतात.

भर चौकात चाललेल्या दांडिया, कृष्णाष्टमी यांसारख्या सण, उत्सवांत सामाजिक प्रबोधन होणे सहज शक्य आहे. त्याऐवजी इमारतीच्या भिंती हालतील अशा आवाजातील डी. जे. लावून जे काही चालू असते. त्यामुळे कोणती शांतता टिकू शकेल? ख्रिश्चन, हिंदू, जैन, मुस्लीम अशा कोणत्याही धर्माच्या मूलतत्त्वांचा या समाजाविरोधी वर्तन करणाऱ्या घटकांनी अभ्यास केल्यास शांततेचा संदेश हे धर्म देतात. विकृतीकरणाचा कोणताही उघड वा छुपेपणाने प्रचार करत नाहीत. असे असतानाही 'अधार्मिक' वातावरण का? धर्माच्या आणि रूढीच्या नावावर बेताल वागणे हा आदर्श तथाकथित नेतृत्व घालून देते, राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि गुन्हेगारीचे राजकियकरण यातील सीमा इतक्या पुसट करून टाकल्या, की 'आपले अस्तित्व' सिद्ध करण्यासाठी प्रदूषणाविषयीचे सर्व नियम धाब्यावर बसण्याची गरज या नेत्यांना जाणवू लागली.

असे असले तरी वर म्हटल्याप्रमाणे या विरोधातील चळवळी कार्यरत होऊ लागल्या आहेत. दारू पिऊन वाहन चालवू नये या नियमाचे उदाहरण याबाबत लक्षात घेता येईल. हा नियम अनेक वर्षे आहे व तो धाब्यावर बसवण्याची परंपराही अनेक वर्षे आहे. पण काही चळवळी, कार्यकर्ते, जनतेचे दबावगट आणि सर्व प्रकारच्या माध्यमांचा सकारात्क सहभाग यामुळे दारू पिऊन गाडी चालवण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटणे यात झाला आहे. त्यामुळे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक नेतृत्वासह सर्व यंत्रणांना विनवावसे वाटते, की ध्वनी प्रदूषण टाळण्याचा शक्यतो सर्व प्रयत्न प्रामाणिकपणे करा. याचा त्रास होणारी शाळेतील मुले आपली आहेत, आजूबाजूच्या इमारतीमध्ये असणारे ज्येष्ठ नागरिक, रूग्ण, नातेवाईक हेही आपलेच आहेत, रुग्णालयामध्ये दाखल केलेले रुग्णही आपलेच नातेवाईक आहेत. सण, धर्म, उत्सव यांचे सर्व महत्त्व मान्य करूनही 'माझ्यामुळे कोणाला त्रास होत नाही ना? हा प्रश्न स्वत:ला विचारा. जागतिक आरोग्य संघटना ही काही देशाची वा देशसमुहाची 'हौशी' संघटना नाही तर तेथे चालणारा अभ्यास, होणारे संशोधन, निघणारे निष्कर्ष हे जगातल्या प्रत्येकासाठी आहेत. पण सण, उत्सव या निमित्ताने आपण प्रबोधनाचे काम केले तरच लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर ही आणि अशी नावे उच्चारण्याचे नैतिक अधिकार आपल्याला राहील. या दृष्टीने गेल्या पाचसात वर्षांपासून होणाऱ्या प्रयत्नांना अल्पसे अंकुर येताना दिसत आहेत. हेही नशीबच म्हणायचे!

डॉ. महेश बेडेकर
ठाणे

•••

# परिसर वार्ता

## सौ. आनंदीबाई जोशी प्राथमिक विभाग

**इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा २०११ :**

| इयत्ता | परीक्षेस बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी |
|---|---|---|
| ५ वी | ३४ | ३१ |
| ८ वी | ४१ | २८ |
| १० वी | ३७ | ३७ |

**सर्वांत जास्त गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :**

| इ. | विद्यार्थ्यांचे नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | अमय दानोले | ८२ |
| | उर्वी गुप्ते | ८२ |
| | सार्थ निकम | ८२ |
| ८ वी | अमित मलिये | ९० |
| १० वी | अदित्य आर्ते | ८२ |

**रामायण परीक्षा २०११-२०१२ :**

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी २७
उत्तीर्ण झालेले विद्यार्थी २६

| विशेष प्राविण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|
| ४ | १२ | ५ | ५ |

विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांची नावे -
विद्यार्थ्यांचे नाव गुण

१) श्रुती कुलकर्णी ८२/१००
२) धीर सावला ८०/१००
३) आकांक्षा क्षिरसागर ८०/१००
४) श्रीदिप क्षिरसागर ८०/१००

इ. ८ वी च्या कु. वैश्णवी गेज्जी आणि कु. रसिका मोरे यांनी 'गुरुकुल क्रीडा मुंबई' आयोजित मुंबई आंतरशालेय टेबलटेनिस स्पर्धेत अनुक्रमे सुवर्णपदक आणि कांस्यपसक पटकावले.

**Junior Maths Olympiad परिक्षा २०१२ चा निकाल :**

Institute of Mathematics Education आयोजित Junior Maths Olympiad परीक्षेची शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालिलप्रमाणे :

इ. ६ वी - कु. श्रीदीप क्षिरसागर
कु. ओंकार वरुडकर
इ. ७ वी - कु. शुभम पट्टेकर
इ. ८ वी - कु. नेहा केळकर
कु. तक्ष सत्रा

**२०११-२०१२ च्या बालवीर व वीरबाला राज्य पुरस्काराचा निकाल : १००%**

**राज्य पुरस्कार मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे :**

| बालवीर | वीरबाला |
|---|---|
| १) कु. सुकृत बेळगावकर | १) कु. हेतवी भानुशाली |
| २) कु. पार्थ बर्वे | २) कु. मिताली राजपूत |
| ३) कु. आदेश छेडा | ३) कु. मिताली राजपूत |
| ४) रित्विज दप्तरदार | ४) कु. भाविका चाळके |
| ५) कु. रुजुल गाला | ५) कु. गौरी चितळे |

| | |
|---|---|
| ६) कु. यश पैसास | ६) कु. मैथिली दळवी |
| ७) कु. नितिश जोशी | ७) कु. सायली कामेरकर |
| ८) कु. अभी कदम | ८) कु. गौरवी खेडेकर |
| ९) कु. अश्विन कुलकर्णी | ९) कु. जिनल व्होरा |
| १०) कु. अभिषेक क्षत्रिय | |
| ११) कु. प्रथमेश कुलकर्णी | |
| १२) कु. भावेश कर्णिक | |
| १३) कु. आशय क्षत्रिय | |
| १४) कु. आदित्य पाटील | |
| १५) कु. दिल सत्रा | |

**एलिमेंटरी व ईंटरमिजिएट चित्रकला श्रेणी परीक्षा २०११-२०१२ :**

महाराष्ट्र राज्य इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेत कु. ऐश्वर्या बापरडेकर ही महाराष्ट्रातील पहिल्या २५ यशस्वी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ते यादीत ४ क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तसेच महाराष्ट्र राज्य एलिमेंटरी चित्रकला परिक्षेत पहिल्या ६० यशस्वी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीत कु. सिद्धि सांगलिकर हिने २७ वा क्रमांक तर कु. नेहा केळकर हिने ४१ वा क्रमांक पटकावला.

| एलिमेंटरी श्रेणी परीक्षा- ९१% | ईंटरमिजिएट श्रेणी परीक्षा- ७९% |
|---|---|
| एकूण विद्यार्थी - ८१ | एकूण विद्यार्थी - २८ |
| उत्तीर्ण विद्यार्थी - ७५ | उत्तीर्ण विद्यार्थी - २२ |
| 'अ' श्रेणी - १० | 'अ' श्रेणी - ०५ |
| 'ब' श्रेणी - १४ | 'ब' श्रेणी - ०७ |
| 'क' श्रेणी - ५१ | 'क' श्रेणी - १० |

**निरोप समारंभ :**

दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ २ फेब्रु. २०१२ रोजी आयोजित करण्यात आला. सुंदर वेषभूषा करुन करमणुकीचे कार्यक्रम सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शालेय आठवणी, त्यांनी शाळेविषयी व मित्र मैत्रिणीविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. काहीही 'अशक्य नाही' या विषयावरील उद्युक्त करणारा व्हिडिओ शो विद्यार्थ्यांनी प्रस्तुत केला. साळा व शिक्षकांविषयीचा आदर स्लाईड शो तर्फे दाखवण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. कोल्हटकर मॅडमने पुढील भविष्य काळासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

**वार्षिकोत्सव २०११ - २०१२ :**

१५ डिसेंबर २०११ रोजी माध्यमिक विभागाचे स्नेहसंमेलन झाले. आमच्या शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. अभिजीत बापट M.B.B.S, MS (Gen. Surgery), DNB (Urology) व डॉ. मृदुला बापट M.B.B.S, DNB (Radiology) ह्यांनी अध्यक्षस्थान भूषविले. मॅडम कोल्हटकर यांनी पालकांचे स्वागत करुन प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर त्यानी २०११ - २०१२ च्या वार्षिक अहवालाचे वाचन केले. मंडळाचे ज्येष्ठ सभासद श्री. मा. य. गोखले यांनी कार्यक्रम यशस्वी होवो असे आशीर्वादरुप भाषण करुन कार्यक्रमाला सुरवात केली. शालेय आणि शालेतर गोष्टींमध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

**क्रीडा दिन २०११-२०१२ :**

या वर्षीचा क्रीडादिन इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी दि. २२ डिसेंबर २०११ रोजी तर इ. ८ वी ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी दि. २३ डिसेंबर २०११ रोजी मावळी मंडळ येथे आयोजित केला होता. विद्यार्थ्यांसाठी खालील स्पर्धा होत्या.

**इ. ५ वी ते ७ वी :**

वैयक्तिक स्पर्धा - ५० मि, १५० मि, ३०० मि

धावणे स्पर्धा; लांब उडी, थ्रो बॉल

सांघिक स्पर्धा - रिले रेस, लंगडी.

**इ. ८ वी ९ वी :**

वैयक्तिक स्पर्धा - ५० मि, २०० मि (मुली), ६०० मि (मुले) धावणे स्पर्धा; लांब उडी, गोळा फेक.

सांघिक स्पर्धा - रिले रेस, डॉज बॉल (मुली), फूटबॉल (मूले)

सर्व विजयी खेळाडूंना प्रमाणपत्रे देण्यात आली.

**आनंदमेळा २०११-२०१२ :**

मंगळवार, २० डिसेंबर २०११ रोजी शाळेत आनंद मेळ्याचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक वर्गाचे स्टॉल होते.

इ. ५ वी - ६ वी : विविध खेळ

इ. ७ वी ते ९ वी : विविध खाद्यपदार्थ

तसेच स्काऊट, गाईड, इंटरॅक्ट क्लब चे ही स्टॉल होते. काही पदार्थ विद्यार्थ्यांनी स्वत: केले होते. सर्व विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी आनंद मेळ्याचे आनंद घेतला.

## वि. प्र. मं. चे ठाणे नगर पालिका विधी महाविद्यालय

➢ वि.प्र.मं.चे ठा.म.पा. विधी महाविद्यालयाची तृतीय वर्षाची विद्यार्थीनी कु. प्रिती चंपकुट्टी हिने दिनांक ३ फेब्रुवारी २०१२ रोजी डि. एस. विधी महाविद्यालय पुणे यांनी आयोजित केलेल्या 'Bill Analysis' स्पर्धेमध्ये Media council bill या विषयावर चर्चा करून दुसरे पारितोषीक मिळवले.

➢ **Future Practitioner club :**

क्लब च्या माध्यमातून वि. प्र. मं. च्या ठा. म. पा. विधी महाविद्यालयात दिनांक ४ फेब्रुवारी १०१२ रोजी 'Skill & legal requirement in examination of witnesses' या विषयावर अॅड. एफ. एन. काझी यांची मुलाखत प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी घेतली.

➢ ११ फेब्रुवारी २०१२ अॅड. संजय बोरकर यांचे 'साक्षीदाराची तपासणी' या विषयावर व्हिडीओ लेक्चर दाखवण्यात आले.

सायंकाळी ८ ते ९ या वेळेमध्ये तपासणी व उलट तपासणी कशी घेतली जाते प्रात्यक्षिक करून दाखवले. सदर प्रात्यक्षिकासाठी कलम ४९८ अ भारतीय दंड संहिता हा विषय घेतला होता. खालील प्राध्यापकांनी प्रात्यक्षिक करून दाखविले.

१. सत्र न्यायधीश : प्रा. विनोद वाघ

२. सरकारी वकील : अॅड. रंजन जोशी

३. आरोपीचे वकील : अॅड. मनोज भट्ट

४. साक्षीदार : प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार

५. स्टेनो : भूषण म्हात्रे (थर्डर्ला विद्यार्थी)

➢ १८ फेब्रुवारी २०१२ : Prosecution आणि Defence चा वादविवाद कसा असावा या विषयी चर्चा ठेवण्यात आली यामध्ये प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार, अॅड. मनोज अॅड. संगीता मेहता यांनी भाग घेतला.

**७ वी डॉ. व्ही. एन्. बेडेकर वाद विवाद स्पर्धा.**

वि. प्र. मं. ठा.म.पा. विधी महाविद्यालयाने दिनांक २० फेब्रुवारी २०१२ रोजी ७ वी डॉ. व्ही. एन्. बेडेकर वाद विवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यामध्ये

सहा महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी भाग घेतला. त्यामध्ये VPM'S TMC Law College, Pravin Gandi Law College, G.J. Adsul Law College, K. C. Law College, Sandesh Law College यांनी भाग घेतला.

सदर स्पर्धेसाठी निवृत्त जिल्हा न्यायाधीश श्री. अे.एल्. आलासपुरके व अॅड. लॅन्सी डिसुझा हे परीक्षक म्हणून होते. सदर स्पर्धेसाठी खालील विषय देण्यात आले होते.

खालील महाविद्यालयाने अनुक्रमे १ २ ३ बक्षीस मिळवले

1. K.C. Law College.
2. VMP's TMC Law College.
3. Pravin Gandhi Law college.

**Best Speaker**

1. Ms. Mitali Khetani
2. Mr. Jayesh Gokhale
3. Ms. M. Devkar & Ms. Neha Batra

➢ वि.प्र.मं. ठा.म.पा. विधि महाविद्यालयाच्या माध्यमातून दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी मराठी दिवस साजरा केला जातो. या वर्षी ही प्रसिद्ध गायिका मधुरा देशपांडे यांचा मराठी गीतांचा कार्यक्रम ठेऊन मराठी दिवस साजरा करण्यात आला. मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर याच्यां पत्नी श्रीमती सुमेधा बेडेकर ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून हजर होत्या.

➢ दिनांक १ मार्च ते ५ मार्च दरम्यान वि. प्र. मं. ठा. म. पा. विधि महाविद्यालयाच्या तिन्ही वर्षाच्या विद्यार्थीच्या प्रात्याक्षिक परीक्षा पार पडल्या.

➢ महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा दि. १,२,४, निकाल दि. १६ मार्च रोजी पुनर्परीक्षा घेण्यात आली.

➢ 'विधी वसंत' हा विविध सांस्कृतिक स्पर्धांचा कार्यक्रम दि. १५ व १६ मार्च रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे संयोजन विद्यार्थी परिषदेने केले होते.

## तंत्रनिकेतन वार्ता

### पॉली-स्पार्क २०११: एक अनोखा सांस्कृतिक सोहळा

तंत्रनिकेतन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम नेहमीच विशेष आणि नवीन उर्जा देणारे शिवाय त्याच्यांत बदल घडवून आणणारे असतात. प्रत्येक वर्षी डिसेंबर महिन्यात तंत्रनिकेतनमध्ये 'Polyspark' चे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांना त्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध होत असते. ह्यावर्षी 'Poly-spark' चे आयोजन दि. १३ डिसेंबर ते १९ डिसेंबर २०११ दरम्यान आयोजित करण्यात आले होते. सुरुवातीला म्हणजे १३ डिसेंबर रोजी 'चॉकलेट डे' आणि 'डेनिम डे' म्हणून साजरा करण्यात आला. हस्तकला टी-शर्ट, पेंटिंग इत्यादी मध्ये विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. परिक्षक म्हणून श्री. टी. व्ही. मोहिते पाटील (विभाग प्रमुख MU Dept) व एस. वाय. सोनावणे (Co-Dept) यांनी काम पाहिले.

१४ डिसेंबर रोजी 'रोज डे' म्हणून साजरा केला. 'सारी क्वीन' 'टायकिंग' गायन आणि नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या. गायन आणि नृत्य स्पर्धांना खुपच प्रतिसाद मिळाला. वरील सर्व कार्यक्रम वि. प्र. मंडळाचे महाविद्यालयीन परिसरातील अत्यंत सुशोभित असलेल्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहात आयोजित केले होते. श्री. मुकुंद मराठे यांनी गाण्याच्या स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. अंतर्गत परिक्षक म्हणून माजी प्राचार्य श्री. मुजुमदार एस. एस. (विभाग प्रमुख केमिकल इंजिनियरिंग) उपस्थित होते.

नृत्य स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सौ. आर. यु. पाटील (EPS - Dept) सौ. सोनावणे (Co. Dept) सौ. अस्मिता करळकर (EPSW - Dept) आणि कु. अमिशा मिस्की (IE-Dept) यांनी काम केले. 'सारी क्वीन' आणि टाय-किंग स्पर्धाला १५ डिसेंबर रोजी सांस्कृतिक दिनानिमित्त आयोजित केल्या गेल्या होत्या. व त्या दिवशी विद्यार्थ्यांना त्यांनी परिधान केलेल्या वेषभुषेबद्दल तसेच त्या संस्कृतीबद्दल, परंपरेबद्दल विवेचन द्यावयास सांगितले होते. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून सौ. उषा राघवन (IF-Dept) आणि सौ. व्ही. ए. जोशी उपस्थित होत्या.

काव्यवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. परिक्षक म्हणून सौ. बी. ए. जोशी (ग्रंथपाल) यांनी काम पाहिले.

१६ डिसेंबर हा दिवस Twins Day आणि odd-day म्हणून साजरा केला गेला. त्याच दिवशी मेहंदी, रांगोळी, पेन्सिल स्केच स्पर्धा घेण्यात आल्या. व त्यासाठी कु. अमिशा मिस्त्री (IE-Dept) यांनी परीक्षकांची भूमिका बजावली.

वरील स्पर्धा पार पाडण्यासाठी प्राचार्य दि. कु. नायक यांचे मार्गदर्शन लाभले. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या प्रमुख म्हणून सौ. किर्ती आगाशे (विभाग प्रमुख IE-Dept) यांनी काम पाहिले. त्यांना सौ. एस. वाय. सोनावणे (Co-Dept) सौ. गौरी दुसाने (IE-Dept) यांनी सहकार्य केले.

वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनमध्ये तृतीय वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा प्रकल्प-प्रदर्शन भरविण्यात आले होते. तंत्रनिकेतल्या इस्ट्रुमेंटेशन विभागातील तृतीय वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रकल्पाचे प्रदर्शन दि. २० मार्च २०१२ रोजी इस्ट्रमेंटेशन विभागात भरविले होते. त्या विद्यार्थ्यांची नावे प्रकल्पाचे नाव व त्यांना मार्गदर्शक म्हणून काम मार्गदर्शकाचे नाव खालीलप्रमाणे

| ग्रुप नं. | रोल नं | विद्यार्थ्यांची नावे | प्रकल्पाचे नाव | मार्गदर्शकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १) | १<br>२<br>७<br>१६ | अभिषेक मेठेकर<br>विवेक शिन्दे<br>प्राजक्ता सोनार<br>निलिमा सालेकर | Water puri<br>Ficarion process<br>Using PLC | मिस. आर. एस कोल्हाळे<br>व मयूर शिंगरे |
| २) | ३<br>४<br>६<br>२२ | अक्शा शेख<br>आकांक्षा चौधरी<br>जयश्री मानसे<br>प्रशांत शेट्टी | Invisible<br>broken wire<br>detector and<br>continutiy tester | कु. डी. व्ही. मेस्त्री |
| ३) | ५<br>८<br>१७<br>२१ | नसरीन शेख<br>सायली बिडरे<br>करिश्मा सनिळ<br>जोस्ना पाटील | Traffic Controler<br>using<br>Microcontroller | सौ. एस. एस. दुभेळे |

'आपण पूर्ण केलेल्या कामांकडे कोणाचे लक्ष जात नाही. मात्र अपूर्ण कामांकडे सर्वांचेच लक्ष असते. - मारी क्युरी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४) | ९<br>१०<br>११<br>१२ | पंकज देसाई<br>इमरान काजी<br>श्रीकांत देठे<br>मयुर खिलारे | Bellows test Using PLC | सौ. व्ही. ए. जोशी |
| ५) | १५<br>१८<br>१९<br>२० | सोनाली गायकवाड<br>गितेश तावडे<br>तेजश तहसिलदार<br>गौरव वैती | PLC based Poly house Automation | सौ. एस. जी. खंडागळे |
| ६) | १३<br>१४<br>२३<br>२४ | रुपेश नवरकर<br>आदित्य कुलकर्णी<br>अदनात तानाजी<br>शाहरूख सातकुट | Temperature Control Of Furnance Using PLC | सौ. एस. डी. खंडागळे |

वृत्तसंकलन
**श्री. चंद्रकांत शिंगाडे**
वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

वि. प्र. मंडळ

### वेळणेश्वरला भेट

वेळणेश्वर येथे उभ्या राहणाऱ्या महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाची जडण घडण पाहण्यासाठी ठाणे व परिसरातील पत्रकारांचा एक गट २१/२२ एप्रिल रोजी वेळणेश्वर येथे गेला होता. रवींद्र मांजरेकर, शशिकांत कोठेकर, मिलींद बल्लाळ, मोहन पाठक यांच्या सोबत IBN चे कॅमेरामनही होते. माननीय डॉ. विजय बेडेकर यांनी या गटास झालेल्या कामाचा परिचय करून दिला. त्यांनी स्वत: या गटास या महाविद्यालयाच्या भविष्यातील विकासाबाबत माहिती दिली.

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

---

'अपयशाचं खापर नशिबावर फोडण्यापेक्षा खडतर मेहनत करून यशाचं शिखर गाठा. - हेरी गोल्डन

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहन:**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणगी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवींचा कालावधी ५/७ व १० वर्षांचा असेल. किमान ३ वर्षापर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवींसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवींच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवींवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●



# स्वप्न साकारत आहे...

हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे मखमली मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालचेंडूंचे, नव्हे ते आश्रितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावलेल्यांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासी मन्त्र त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणी, न एका दिनी,
न एके यामिनी
दिनरात्र मानसीं स्फुरे, सतत निदिध्यासही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता ज्याची महान, सीमा ज्याची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत आपुलें करितां
स्वप्न दिसे साकारतें
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा –
ओसाड भूमी कर्दमी जिथे पाय
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न ज्या कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, द्रुप ज्यांचे महान,
शिल्पही ज्यांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,

द्रुप देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
कवींचे जिथे बहरती फुलताटवे रंगसंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मन्त्र घोळके, स्वप्न रंगवितां मन्त्र जे मानसी
स्वप्न त्यांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथे रंगती
विज्ञानसत्री सदा ज्यांची वाहिली मती,
कलावंत, सारस्वतांचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा ज्यांची देदीप्यमान
भूदल-सागर-सैनिक, वायुदलही इथे निर्मिती
शक्तियुक्ति ज्यांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरीक, प्रयत्नी इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर ज्यांचे अणुरेणी वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड त्यांची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे त्यांभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि ज्याची, शक्ति ज्याची भारतभूचा ठेवा

– डॉ. वा. ना. बेडेकर